cmyk

## संपादकीय

### प्रादेशिक पक्षांचा हिसका

भाजपला शह देण्यात काँग्रेस किती यशस्वी झाली हा संशोधनाचा मुद्दा असला तरी कमीपणा घेतल्यानंतर प्रादेशिक पक्षांच्या मदतीने भाजपला सत्तेपासून रोखता येते हे काँग्रेसला दिसून आले आहे. शिवाय भाजप अजिंक्य असल्याचा समजही आता दूर झाला आहे. प्रादेशिक पक्षांनीच मातब्बर पक्षाला शह दिला. काँग्रेसला सत्तेतून पायउतार करण्यासाठी आणीबाणीनंतर पहिल्यांदाच देशातल्या काँग्रेस विरोधकांनी एकत्र येत सत्ता मिळवली. व्ही. पी. सिंग यांचे सरकारही असेच प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्षांच्या पाठिंब्यावर सत्तेत आले होते.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–६० | सोमवार दि.१० जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


### आम्ही राज्यमंत्रीपदाची ऑफर नाकारली–अजित पवार

मुंबई : भाजपकडून आम्हाला राज्यमंत्रीपदाची ऑफर देण्यात आली होती. मात्र आम्ही ही ऑफर स्वीकारली नाही. कारण राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल हे यापूर्वी विविध मंत्रीमंडळांमध्ये कॅबिनेट मंत्रीपदावर राहिले आहेत. त्यामुळे आम्ही कॅबिनेट मंत्रीपदसाठी आग्रही आहोत. त्यामुळेच आम्ही राज्यमंत्रीपद स्वीकारले नाही, असे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अध्यक्ष अजित पवार यांनी रविवारी (दि.९) माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. आमची राज्यसभेची एक जागा आहे. लोकसभेची एक जागा आहे.

# मुंबई बाजार समितीचे वर्षात ११७ कोटीचे उत्पन्न !

## आशिया खंडातील सर्वांत मोठी बाजार समिती, वर्षाला १० हजार कोटींची उलाढाल

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीने २०२३ – २४ मध्ये ११७ कोटी रूपयांचे उत्पन्न मिळविले आहे. गतवर्षीपेक्षा ११ कोटी जास्त महसूल मिळविण्यास प्रशासनाला यश आले आहे. आशिया खंडातील सर्वांत मोठी बाजार समिती म्हणून ओळख असलेल्या मुंबई बाजार समितीमध्ये वर्षाला ८ ते १० हजार कोटी रूपयांची उलाढाल होते.**

कांदा, मसाला, धान्य, फळ व भाजीपाला या पाच प्रमुख बाजारपेठांचा बाजार समिती आवारात समावेश होतो. २०२२ – २३ मध्ये बाजार फी व इतर मार्गाने बाजार समितीला १०६ कोटीचे उत्पन्न झाले होते. यामध्ये वाढ करण्यात प्रशासनाला यश आले आहे. वर्षभरात ११७ कोटीचे उत्पन्न प्राप्त केले आहे. यामध्ये बाजार फीच्या माध्यमातून ८७ कोटी रुपये उत्पन्न मिळविले आहे. यापूर्वी २०१४ मध्ये बाजार फीच्या माध्यमातून ८४ कोटी रुपये मिळवण्यात आले होते. शासनाने फळे, भाजीपाला, कांदा, बटाटा शेतमालाचे नियमन फक्त मार्केटपुरते मर्यादीत केले आहे. सुकामेवा, साखर, रवा, मैदासह अनेक वस्तू नियमनातून वगळल्या आहेत. पान २ वर




### नीट परीक्षेबाबत आवाज उठवू – राहुल गांधीं

**नवी दिल्ली। वृतसंस्था**



**वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय प्रवेश पात्रता परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत गुणांमध्ये झालेली वाढ हा वादाचा विषय ठरला आहे. ''या प्रश्नी मी संसदेत तुमचा आवाज असेन,'' अशी ग्वाही काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांना दिली आहे.**

यंदा 'नीट' परीक्षार्थींना अधिक गुण मिळालेल्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे चांगले गुण मिळवलेल्यांनाही सरकारी महाविद्यालयांतील प्रवेश दूरचा ठरण्याची शक्यता आहे. रविवारी संध्याकाळी ७.१७ वाजता होणाऱ्या शपथविधी समारंभापूर्वी राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर टीका पान २ वर

### रामोजी राव अनंतात विलीन

**हद्राबादः देशातील नामवंत उद्योगपती आणि रामोजी फिल्म सिटीचे संस्थापक, माध्यम सम्राट रामोजी राव यांचे शनिवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर देशभरातील दिग्गजांनी शोक व्यक्त करत आंदरांजली वाहिली.**

पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अनेक बड्या राजकीय नेत्यांनी व सेलिब्रिटींनी रामोजी राव यांच्या निधनावर शोक व्यक्त करत आपल्या भावना मांडल्या. रामोजी राव यांच्या पार्थिवावर रविवारी रामोजी फिल्म सिटी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. तेलंगणा सरकारने शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार, तेलंगणा व आंध्र प्रदेशमधील बड्या राजकीय नेत्यांच्या व सेलिब्रिटींच्या उपस्थितीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रामोजी फिल्म सिटीमध्ये टीडीपीचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी रामोजी राव यांच्या पार्थिवाला खांदा दिला. राव यांच्या कुटुंबातील सदस्यांसमवेत चंद्राबाबू नायडू अंत्यसंस्कारात सहभागी झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा शपथविधी सोहळा आयोजित करण्यात आला होता टीडीपीचे प्रमुख चंद्राबाबू नायडू हेही या शपथविधीला उपस्थित राहणार होते. तत्पूर्वी रामोजी राव यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पान २ वर

# मोदी हॅट्ट्रीक; भारतवर्षात तिसरे पर्व सुरु

## नरेंद्र मोदींनी घेतली तिसऱ्यांदा शपथ; महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश






**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे. तिसऱ्यांदा शपथ घेत मोदींनी हॅट्ट्रीक साधली असून भारत वर्षात तिसरे मोदीपर्व सुरु झाले आहे. यावेळी अमित शहा, राजनाथ सिंह, जेपी नड्डा, निर्मला सितारामन यांच्यासह महाराष्ट्रातील नितीन गडकरी, पियुष गोयल, प्रतापराव जाधव, रामदास आठवले, मुरलीधर मोहळ आणि रक्षा खडसे यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली.**







राष्ट्रपती भवनात मोदींचा शपथविधी सोहळा पार पडला आहे. मोदींच्या शपथविधी सोहळ्याला अनेक देशांच्या प्रमुखांनी उपस्थिती लावली आहे. शिवाय, एनडीएतील घटक पक्षांसह देशाभरातील खासदार आणि बॉलिवडू सेलिब्रिटींनी पीएम मोदींना शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी पीएम मोदींनी पद आणि गोपिनियतेची शपथ घेतली. नवीन सरकारमध्ये एनडीएच्या विविध घटकांना मंत्रिमंडळात समाविष्ट करण्यासाठी भाजप आणि मित्रपक्षांमध्ये चर्चा झाली होती, त्यानंतर हा शपथविधी सोहळा पार पडला आहे. पंतप्रधान नरेंद मोदी यांच्यानंतर राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी यांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. यापूर्वीच्या सरकारमध्ये अमित शाह यांच्याकडे गृहखाते होते. तर नितीन गडकरी भूपृष्ठ आणि रस्ते वाहतूक मंत्रिपदाचा पदभार सांभाळत पान २ वर

### अजित पवारांना एकही मंत्रीपद नाही

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला राज्यमंत्री पद दिले जाणार होते, मात्र सुनिल तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्यात मंत्रीपदावरुन रस्सीखेच झाल्याने कोणालाच मंत्रीपद न घेण्याचे पक्षाने ठरवले असल्याचे म्हटले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला विस्तारात कॅबिनेट मंत्रीपद मिळेल, असे समजते.

### कसं आहे मोदींचं मंत्रिमंडळ?

मोदी सरकार मंत्रिमंडळात ७२ मंत्र्यांचा समावेश आहे. यामध्ये ३० कॅबिनेट मंत्री, ५ स्वतंत्र प्रभार असलेले राज्यमंत्री आणि ३६ राज्यमंत्री यांचा समावेश आहे. मोदी कॅबिनेट ३.० मध्ये सर्व सामाजिक गटांचे नेतृत्व करणारे चेहरे या मंत्रिमंडळात आहेत. यामध्ये ओबीसी २७, एसी १०, एसटी ५ आणि ५ अल्पसंख्याक नेत्यांचा समावेश आहे. यातील १८ मंत्र्यांचा कॅबिनेटमध्ये समावेश आहे.

### मराठवाड्यासह कोकणवर अन्याय

#### जुन्या कॅबिनेटमधील २० मंत्र्यांना मंत्रिमंडळातून वगळले

नवी दिल्ली : नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली आहे. त्यांच्यासह मंत्रिमंडळातील इतर नेत्यांही मंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र मराठवाड्यासह कोकणला स्थान मिळाले नाही. विद्यमान २० मंत्र्यांचा पत्ता कट झाला असून नारायण राणे आणि मराठवाड्यातील भागवत कराड यांना यावेळी वगळण्यात आले आहे. त्यामुळे मोदींचे मराठवाड्याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसते.

स्मृती ईराणी, अनुराग ठाकूर, राजीव चंद्रशेखर, अजय मिश्रा टेनी, जनरल व्हीके सिंह, अश्विनी चौबे, अजय भट्ट, साध्वी निरंजन ज्योती, मीनाक्षी लेखी, राजकुमार रंजन सिंह, आरके सिंह, अर्जुन मुंडा, निशीथ प्रामाणिक, सुभाष सरकार, जॉन बारला, भारती पवार, पान २ वर

### कोणत्या नेत्यांनी घेतली मंत्रिपदाची शपथ?

राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी, जे.पी.नड्डा, शिवराज सिंह चौहान, निर्मला सीतारामण, कुमारस्वामी, मनोहर लाल खट्टर, डॉ. एस. जयशंकर, धर्मेंद्र प्रधान , जीतन राम मांझी, राजीव रंजन सिंह, पीयुष गोयल, सर्वानंद सोनोवाल, डॉ.वीरेंद्र कुमार, के राममोहन नायडू, वीरेंद्र खटीक, ज्योतिरादित्य शिंदे, अश्विनी वैष्णव, गिरीराज सिंह, जुएल ओराम, भुपेंद्र यादव, हरदीप सिंह पुरी, किरेन रिजुजू, गजेंद्र सिंह शिखावत, अन्नपूर्णा देवी, चिराग पासवान, गंगापूरम किशन रेड्डी, डॉ. मनसुख मांडविया, सी आर पाटील,रामदास आठवले, प्रतापराव जाधव, मुरलीधर मोहळ, रक्षा खडसे

### काश्मीरमध्ये भाविकांच्या बसवर दहशतवादी हल्ला; १० जणांचा मृत्यू

**जम्मू । वृतसंस्था**

**काश्मीरमधील रियासी जिल्ह्यात रविवारी भाविकांच्या बसवर दहशतवाद्यांनी गोळीबार केला. या गोळीबारानंतर बस एका खोल दरीत कोसळली असून हल्ल्यात बसमधील दहा प्रवाशांचा मृत्यू झाला आहे.**

वैष्णोदेवीपासून ८० किलोमीटर अंतरावर शिवखोरी हे धार्मिक स्थळ आहे. या भागात शंकर मंदिर असून देशभरातील भाविक या धार्मिक स्थळाला भेट देतात. रविवारी संध्याकाळी खासगी बसमधून भाविक देवदर्शन करून परतत होते. कटराच्या दिशेने ही बस जात असताना रियासी जिल्ह्यातील चंडी मोडजवळ या बसवर दहशतवाद्यांनी गोळीबार केला. या गोळीबारात बसचालक गंभीर जखमी झाल्याने त्याचे बसवरील नियंत्रण सुटले पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०७ जून २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १४.०० क्विंटल | २,२२६ | ३,१०१ | २,४६९ |
| ज्वारी/हायब्रिड : १६८.५० क्विंटल | १,८०० | ४,४६० | २,३८६ |
| मूग : ०.५० क्विंटल | ७,८१० | ७,८१० | ७,८१० |
| तूर : ८.०० क्विंटल | ११,१९९ | ११,४०१ | ११,३२५ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ४६.५० क्विंटल | २,३०१ | २,७०१ | २,४८५ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: २००.५० क्विंटल | ४,४७५ | ४,५२१ | ४,४९२ |
| हरभरा: १९.५० क्विंटल | ५,८०० | ६,६०१ | ६,२६३ |

# तुम्हाला मुंडेसाहेबांची शपथ, माझ्यासाठी मरणयापेक्षा...

## बीडमध्ये तणाव, पंकजा मुंडेंचे समर्थकांना आवाहन



**बीड । प्रतिनिधी**

**माझ्यासाठी मरण्यापेक्षा आपल्या उद्देशासाठी जगा. आई बापाला दुःख देऊ नका. त्यांच्या जीवाला घोर लावू नका, तुम्हाला शप्पथ आहे मुंडे साहेबांची... असे ट्विट पंकजा मुंडेंनी केले आहे. पंकजा मुंडष यांचा पराभव जिव्हारी लागल्याने लातूर जिल्ह्यात येथे सचिन मुंडे यांच्यानंतर आंबाजोगाई तालुक्यातील डिघोळ आंबा येथील पांडूरंग सोनवणे यांनी आत्महत्या केल्यानंतर पंकजा मुंडे यांनी ही भावनिक पोस्ट केली आहे.**

लोकसभा निवडणूक निकालात पान २ वर

#### मनोज जरांगे यांच्या समर्थनार्थ कार्यकर्ते रस्त्यावर

शिरुर बंद दरम्यान माजी जिल्हा परिषद सदस्य दशरथ वनवे यांनी वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर बीड शहरात मराठा समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. पोलिस अधिक्षक कार्यालयावर मोर्चा काढून मनोज जरांगे यांना समर्थन देण्यात आले. मराठा समाजातील तरुणांना त्रास देऊ नका, जर दिला तर त्याचे गंभीर परिणाम होतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

### पंकजा मुंडेंचा पराभव जिव्हारी लागल्याने तरुणाची आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई तालुक्यातील दिघोळ आंबा गावातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. पंकजा मुंडे यांचे समर्थक पांडुरंग सोनवणे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती समोर आलीये. पंकजा मुंडे यांचा लोकसभेतील पराभव जिव्हारी लागला म्हणून पांडुरंगने आपले जीवन संपवले असल्याचे जवळच्या नातेवाईकांकडून सांगितले जात आहे.**



बीड लोकसभा मतदारसंघातून यंदा पंकजा मुंडे यांना लोकसभेचं तिकीट देण्यात आलं होतं. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून बजरंग सोनावणे रिंगणात होते. नुकताच बीड लोकसभेचा निकाल हाती आला या निकालात महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचा पराभव झाला. दरम्यान त्यानंतर पंकजा मुंडे यांच्या समर्थकांमध्ये बरीच नाराजी पाहायला मिळाली. दोन दिवसापुर्वी पान २ वर

# मान्सून मुंबईत दाखल

## १२ तारखेला पोहोचणारा ९ जूनलाच पोहोचला

**मुंबई । प्रतिनिधी**

**नैऋत्य मान्सून ३० मे रोजी केरळ आणि ईशान्य प्रदेशात लवकर दाखल झाल्यानंतर नेहमीपेक्षा दोन दिवस आधी ९ जून रोजी मुंबईत दाखल झाला. रविवारी ९ आणि ११ जून रोजी मुंबईसह महाराष्ट्रात मान्सून दाखल होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने यापूर्वीच व्यक्त केला होता. त्यानुसार मान्सून मुंबईत दाखल झाल्याचे भारतीय हवामान खात्याने सांगितले. दरम्यान, मान्सूनच्या या पहिल्याच पावसात राष्ट्रीय महामार्ग ४८ अर्थात मुंबई – अहमदाबाद रस्ता हा खचला असून या मार्गावर वाहतूक कोंडी झाल्याचे पहायला मिळत आहे.**

#### शेतीसाठी मान्सून महत्वाचा...

भारताच्या कृषी क्षेत्रासाठी मान्सून महत्त्वाचा आहे, निव्वळ लागवडीखालील ५२% क्षेत्र त्यावर अवलंबून आहे. देशभरातील वीजनिर्मिती व्यतिरिक्त पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक असलेले जलाशय भरून काढणे देखील महत्त्वाचे आहे. जून आणि जुलै हे शेतीसाठी सर्वात महत्त्वाचे मान्सून महिने मानले जातात कारण या काळात खरीप पिकाच्या बहुतांश पेरण्या होतात.

२१ जून १९६१ नंतर पहिल्यांदाच गेल्या वर्षी २५ जून रोजी नैऋत्य मान्सून दिल्ली आणि मुंबईत पोहोचला. चक्रीवादळ बिपरजॉयने दक्षिण भारत आणि देशाच्या लगतच्या पश्चिम आणि मध्य भागांवर मान्सूनच्या प्रगतीवर परिणाम केला आहे. साधारणपणे, मान्सून १ जूनपर्यंत केरळमध्ये, ११ जूनपर्यंत मुंबईत आणि २७ जूनपर्यंत राष्ट्रीय राजधानी दिल्लीत पोहोचतो. १५ मे रोजी हवामान खात्याने केरळमध्ये ३१ मे पर्यंत मान्सून सुरू पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# प्रादेशिक पक्षांचा हिसका


भाजपला शह देण्यात काँग्रेस किती यशस्वी झाली हा संशोधनाचा मुद्दा असला तरी कमीपणा घेतल्यानंतर प्रादेशिक पक्षांच्या मदतीने भाजपला सत्तेपासून रोखता येते हे काँग्रेसला दिसून आले आहे. शिवाय भाजप अजिंक्य असल्याचा समजही आता दूर झाला आहे.

प्रादेशिक पक्षांनीच मातब्बर पक्षाला शह दिला. काँग्रेसला सत्तेतून पायउतार करण्यासाठी आणीबाणीनंतर पहिल्यांदाच देशातल्या काँग्रेस विरोधकांनी एकत्र येत सत्ता मिळवली. व्ही. पी. सिंग यांचे सरकारही असेच प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्षांच्या पाठिंब्यावर सत्तेत आले होते. अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार प्रादेशिक पक्षांच्या मदतीने सत्तेत आले होते. अण्णाद्रमुक, तृणमूल काँग्रेस, शिवसेना, संयुक्त जनता दल, पीडीपी, शिरोमणी अकाली दल आदी पक्ष त्यात सहभागी झाले होते. भाजपने सुरुवातीला प्रादेशिक पक्षांना मोठेपण देत आपलेसे केले होते. २०१४ मधल्या मोदी लाटेत काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांची भंबेरी उडाली. यानंतरच्या काळात तर काँग्रेसला अनेक राज्यांमधील सरकारे गमवावी लागली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतही मोदी यांनी करिष्मा दाखवला. सत्ता आली की मित्रपक्षांना मोठेपण द्यायचे भाजप विसरला. त्यामुळे मित्रपक्ष भाजपवर नाराज व्हायला लागले. पीडीपीचा पाठिंबा काढून घेऊन भाजपने काश्मीरमधली सत्ता गमावली तर महाराष्ट्रात मुख्यमंत्रिपदाचा कथित शब्द देऊनही न पाळल्याने शिवसेनेने भाजपशी असलेले मैत्रीचे पाश तोडून दोन्ही काँग्रेससोबत सत्ता स्थापन केली. त्यामुळे महाराष्ट्रात सर्वाधिक जागा मिळूनही भाजपला सत्तेपासून दूर राहावे लागले. झारखंड राज्याच्या स्थापनेपासून मित्रपक्षासोबत निवडणूक लढवून सत्तेत सहभागी झालेल्या भाजपने यावेळी स्वबळाचा नारा लावला आणि राज्यात स्वतंत्रपणे निवडणूक लढवून सत्ता गमावली. तब्बल २२ राज्यांमध्ये सत्ता प्राप्त केलेल्या भाजपच्या पडझडीची सुरुवात २०१८ मध्ये सुरू झाली. त्यावर्षी पक्षाला हिंदी पट्ट्यातली राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड ही तीन राज्ये गमवावी लागली. तत्कालीन जम्मू-काश्मीरमधे पीडीपीच्या सहकार्याने स्थापन केलेल्या आघाडी सरकारला याच वर्षी ग्रहण लागले आणि हे सरकार पडले. यानंतर कर्नाटकमध्ये येडियुरप्पा यांच्यावर मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्याच्या चार दिवसांमध्येच राजीनामा देण्याची वेळ आली. नंतर 'ऑपरेशन लोटस' मोहीम राबवून त्यांनी पुन्हा भाजपचे सरकार बनवले हा भाग वेगळा. नितीशकुमार हे कधी कुरघोडीचे राजकारण करतील, याचा भरवसा नाही. सर्व विरोधी पक्ष एकत्र आले तर भाजपचा पाडाव होऊ शकतो, हे महाराष्ट्र तसेच अन्य राज्यातल्या राजकीय घडामोडींनी दाखवून दिले आहे. त्यामुळे आगामी काळात महाराष्ट्रात होणारी विधानसभा निवडणुक भाजपासाठी अत्यंत महत्वाची आहे. शिंदे, अजित पवार यांच्या सोबतीने भाजपा लढणार आहे, परंतू या दोन्ही पक्षाची लोकसभेत झालेली हालत विचार करायला लावणारी आहे.

# बी-बियाण्यांच्या वाढत्या किमतीने शेतकरी हतबल-अ‍ॅड.अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

**कृषी विभागाकडून बैठका घेऊन बि-बीयाणे आणि खते विक्रीवर नियंत्रण ठेवले जात आहे, हे दाखवण्याचा भास निर्माण केला जात आहे. प्रत्यक्षात बेभाव विक्री चालू असून यामुळे उन्हाच्या तीव्रतेने होरपळलेला शेतकरी त्रस्त झाला आहे. त्यामुळे कृषी विभागाने यावर तात्काळ नियंत्रण आणावे. अन्यथा शेतकऱ्यांच्या रोशाला सामोरे जावे लागेल, असा इशारा जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी दिला आहे.**



पाऊस पडला असल्याने शेतकऱ्यांना आता बी बियाणे आणि खतांची तात्काळ गरज आहे. मात्र दुप्पट किमतीने विकले जाणारे बियाणे शेतकऱ्यांनी खरेदी कसे करावे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे गेल्या काही वर्षांपासून निसर्गाचे संतुलन ढासळलेले असताना शेतकऱ्यांना चढ्या भावाने बियाणे विक्री होत असताना प्रशासन गप्प का ? असाही प्रश्न निर्माण होत आहे. प्रत्येक दुकानदाराने आपल्याकडे स्टॉक किती आहे ? कोणते बियाणे कोणत्या दराने विकले जातात ? याचे दर पत्रक आपल्या दुकानात लावणे बंधनकारक आहे. गेल्या काही वर्षांपासून हा नियम आमच्या आंदोलनानंतर लागू करण्यात आला होता. मात्र याचाही विसर बऱ्याच ठिकाणी पडलेला दिसतो. वास्तविक पाहता कृषी विभागाने जिल्ह्याच्या काना - कोपऱ्यातील प्रत्येक दुकानात जाऊन किती माल शिल्लक आहे ? कोण कोणत्या प्रकारची बियाणे शिल्लक आहेत ? खतांचा तुटवडा का भासवला जातो ? हे पहायला हवे. यामुळे ठोक आणि किरकोळ विक्रीच्या दुकानावर अचानक धाडी टाकून तपासणी केली पाहिजे. पण ते होत नाही. त्यामुळे या खात्यात भ्रष्टाचार माजला असल्याचे वर वर पाहता दिसते. शेतकऱ्यांची हित जोपासण्यासाठी कृषी विभागाने दक्ष रहावे अन्यथा जिल्ह्याच्या कृषी विभागाकडे आणि तेथे चाललेल्या अनागोंदीकडे आम्हाला लक्ष द्यावे लागेल, असेही अँड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# जिल्हास्तरीय फ्लोरेन्स नाइटंगल सलग दुसऱ्या वर्षी केज उपजिल्हा रुग्णालयाला पुरस्कार

**केज । प्रतिनिधी**

**उपजिल्हातील आधिपरिचारिका( सिस्टर ) सौ.साविता भारत सत्वधर ( भोपळे) यांना प्रथम पुरस्काराने गौरविण्यात आले तसेच दुतीय पुरस्कार केज उपजिल्हा रुगणाल्याचा श्रीमती .त्रिशाला कराड सिस्टर यांना देण्यात आला.**

परिसेविका मधील प्रथम पुरस्कार ही केज उप जिल्हा रुग्णायल्याचा श्रीमती .वंदना उबाळे सिस्टर याना देण्यात आला सदर कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजिक न्याय भवन सभागृह बीड येथे आज दिनांक ६/६/२०२४ रोजी दुपारी १ वाजता संपन्न झाला या कार्यक्रमास प्रमुख पाहुने डॉ. उल्हास गंडाळ सर जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड, डॉ. रौफ सर सहाय्यक जी.आरोगय अधिकारी,डॉ. सचिन शेकडे जी.म.बा.सं. अधिकारी वा डॉ. विकास आठवले तालुका आरोग्य अधिकारी केज उपस्थित होते सदर मानाचा पुरस्कर केज ला मिळाल्या बद्दल केज उपजिल्हा रुणालयाचे वैद्यकीय आधिक्षक डॉ.केंद्रे सर ,केज नगर पंचायत चे नगर सेवक तसेच बांधकाम सभापती आरून आण्णा गुंड यांनी आभिनंदन केले जिल्हास्तरीय फ्लोरेन्स नाइटंगल पुरस्कर सलग दुसऱ्या वर्षी केज उपजिल्हा रुग्नालयाला. मीळाला उपजिल्हातील आधिपरिचारिका( सिस्टर ) सौ.साविता भारत सत्वधर ( भोपळे) यांना प्रथम पुरस्काराने गौरविण्यात आले तसेच दुतीय पुरस्कार केज उपजिल्हा रुगणाल्याचा श्रीमती .त्रिशाला कराड सिस्टर यांना देण्यात आला. परिसेविका मधील प्रथम पुरस्कार ही केज उप जिल्हा रुग्णायल्याचा श्रीमती .वंदना उबाळे सिस्टर याना देण्यात आला सदर कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजिक न्याय भवन सभागृह बीड येथे आज दिनांक ६/६/२०२४ रोजी दुपारी १ वाजता संपन्न झाला या कार्यक्रमास प्रमुख पाहुने डॉ. उल्हास गंडाळ सर जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड, डॉ. रौफ सर सहाय्यक जी.आरोगय अधिकारी,डॉ. सचिन शेकडे जी.म.बा.सं. अधिकारी वा डॉ. विकास आठवले तालुका आरोग्य अधिकारी केज उपस्थित होते सदर मानाचा पुरस्कर केज ला मिळाल्या बद्दल केज उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय आधिक्षक डॉ.केंद्रे सर ,केज नगर पंचायत चे नगर सेवक तसेच बांधकाम सभापती आरून आण्णा गुंड यांनी आभिनंदन केले.




# बाबळसुर येथे तिहेरी अपघातात दोन ठार

**उमरगा । प्रतिनिधी**

**लातूर येथून उमरगा कडे येत असताना लातूर गुलबर्गा मार्गावर बाबळसुर पाटीवर इनोव्हा कार व पिकअप टेंपो व आयशर ट्रकची तिहेरी धडक होऊन ईनोव्हा कार मधील दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी दि . रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास घडली.**

सविस्तर वृत्त असे की, मातोळा गावचे रहिवासी असलेले दत्तात्रय गोंविंद गिरी वय ३१ हे त्यांचे मित्र निखिल नामदेव भोसले यांच्या सोबत लातूर येथून उमरगाकडे इनोव्हा कार ने येत असताना लातूर गुलबर्गा मार्गावरील बाबळसुर पाटी वर समोरून येणाऱ्या पिकआप टेम्पोची समोरासमोर धडक बसून भीषण अपघात झाला. यावेळी इनोव्हा कारच्या पाठीमागून येणारी आयशर ट्रकही दोन्ही वाहनावर येवून आदळली यात दत्तात्रय गिरी व निखिल भोसले हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना घटनास्थळी उपस्थितांनी तात्काळ उमरगा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले पण डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले.तर इतर दोघे जखमी आहेत.शनिवारी दोन्ही मयतांचे शवविच्छेदन करण्यात येऊन त्यांच्या मूळ गावी मातोळा येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला.

# दगडूशेठ गणेश मंडळाचा देखावा ठरला आशियातील सर्वात उंच शिवमंदिर

**पुणे । प्रतिनिधी**

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टतर्फे १३२ व्या वर्षाच्या गणेशोत्सवानिमित्त हिमाचल प्रदेशमधील जटोली शिवमंदिराची प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. आशियातील सर्वात उंच शिवमंदिर म्हणून हे मंदिर ओळखले जाते.**

उत्तुंग हिमालयाच्या सानिध्यात प्रतिष्ठित आणि अत्यंत पवित्र असलेल्या मंदिराची तेजस्वी प्रतिकृती यंदाच्या गणेशोत्सवात दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट तर्फे साकारण्यात येणार असून भाविकांकरीता विशेष आकर्षण ठरणार आहे अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष माणिक चव्हाण यांनी दिली. त्यामुळे, यंदाच्या गणेशोत्सवात गणपती देखावे पाहण्यासाठी येणा-या भाविक भक्तांना व पर्यटकांना हिमाचल प्रदेशमधील प्रति शिवमंदिराच्या दर्शनाचा लाभ घेता येईल असेच म्हणावे लागेल. सणस मैदानासमोरील हिराबाग कोठी येथील ट्रस्टच्या सजावट विभागात सजावटीचा शुभारंभ सोहळा कलादिग्दर्शक अमन विधाते व दिपाली विधाते यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस हेमंत रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. गेली अनेक वर्षे विविध मंदिरांची उत्कृष्ट प्रतिकृती सजावटीतून साकारण्याकरीता ट्रस्ट प्रयत्नशील आहे. यंदाची प्रतिकृती असलेले हिमाचल प्रदेशच्या सोलन मधील जटोली शिव मंदिर हे डोंगराच्या माथ्यावर वसलेले भव्य मंदिर आहे. जटोली हे नाव महादेवाच्या लांब जटावरून पडले आहे. हे मंदिर स्थापत्यकलेचा चमत्कार आहे. पुराणातील उल्लेखानुसार भगवान शिवाच्या सर्वात प्राचीन मंदिरांपैकी एक असून हे मंदिर एकेकाळी भगवान शंकराचे विश्रामस्थान होते असे मानले जाते. जटोली मंदिर विशिष्ट अशा दक्षिण-द्रविड वास्तुशैलीमध्ये बांधले गेले आहे आणि ते सलग तीन पिरॅमिड ने बनलेले आहे. पहिल्या पिरॅमिडवर गणेशाची प्रतिमा तर दुस-या पिरॅमिडवर शेष नागाची प्रतिमा दिसते. हे मंदिर बांधण्यासाठी ३९ वर्षे लागली. या मंदिराची उंची अंदाजे १११ फूट आहे. मंदिरातील दगडांवर थाप मारल्यावर डमरू सारखा आवाज देखील येतो.

# ट्रॅक्टर ट्रॉली नदीत उलटली; १ बेपत्ता

**बेळगाव । प्रतिनिधी**

**प्रवाशांनी भरलेली ट्रॅक्टर ट्रॉली नदीत उलटल्याची मोठी दुर्घटना बेळगावमध्ये घडली आहे. बेळगाव जिल्ह्यातील आवरादी गावाजवळ १३ जणांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर घटप्रभा नदीत उलटला आहे. यापैकी बारा जण बचावले असून एक जण पाण्यातून वाहून गेला. ट्रॅक्टरमधून १३ जण आवरादी येथून नांदगाव येथे मजुरीसाठी निघाले होते. ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमधून १३ जण प्रवास करत होते. घटप्रभा नदी ओलांडून दररोज हे मजूर कामावर जात होते.**



प्रवाशांनी भरलेली ट्रॅक्टर ट्रॉली घटप्रभा नदीत उलटली. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून बचावकार्य सुरू केले आहे. पोलिसांनी नदीत वाहून गेलेल्या व्यक्तीचा शोध सुरू केला आहे. या दुर्घटनेतील १२ जण बचावल्याची माहिती असून एक जण अद्यापही बेपत्ता आहे. या बेपत्ता व्यक्तीचा शोध सुरू आहे. प्रशासन बचावकार्यात गुंतलेले आहे. कुलगोड पोलिस स्थानकात या घटनेची नोंद झाली आहे.

# मुक्या जनावरांची क्रूर वाहतूक;गुन्हा दाखल

**परळी । प्रतिनिधी**

**बैल प्रजातीच्या मुक्या जनावरांची क्रूरतेने वाहतूक केल्या प्रकरणी संभाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार इमरान गुलाम नबी अत्तर हा आपल्या छोटा हात्ती गाडी क्र.-१७ -४३०३ बैल जातीचे जनावर ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी वेदना होतील आशा रीतीने क्रूर वागणुक देवुन व छळ करून घेवुन जात आसतांना शहरातील औष्णिक वीज निर्मिती केंद्र वसाहत जवळ थांबुन सदर वाहणाची पाहनी करत असताना संभाजी नगर पोलिसांच्या तावडीत सापडला. वाहनांची तपासणी केली असता त्यात बैल जीतीचे व दोन जनावरे डालगट जनावर मिळुन आले.या प्रकरणी शंकर बाबुराव डोंगळे (पोलीस कर्मचारी संभाजी नगर) यांच्या फिर्यादीवरून संभाजी नगर पोलीस ठाण्यात गुरन - ९५/२०२४ कलम ११(१), (), ११(१), () भी प्राणी छळ प्रतीबंधक कायदानुसार वाहन चालक इमरान गुलाम नबी अत्तार याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास पोलीस कर्मचारी सानप हे करीत आहेत.

# भाजपात आल्याने अशोक चव्हाण यांचे मोठे नुकसान

## माजी केंद्रीय मंत्री सुर्यकांता पाटील यांचे मत

**मुंबई । प्रतिनिधी**

**माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण भाजपात आले भाजपला समाधान झाले असेल, पण अशोक चव्हाण यांचे मात्र भाजपात येऊन खूप मोठे नुकसान झाले आहे. एक राज्यसभा ही अशोक चव्हाण यांची लायकी नाही, अशोक चव्हाण यापेक्षा खूप मोठे आहेत. त्यामुळे अशोक चव्हाण यांचं भाजपात येऊन खूप मोठे नुकसान झाले आहे, अशी प्रतिक्रिया भाजपाच्या नेत्या माजी केंद्रीय मंत्री सूर्यकांता पाटील यांनी दिली आहे.**

नांदेड लोकसभा निवडणुकीत भाजपचा पराभव झाल्याने सध्या जिल्ह्यामध्ये हा पराभव खासदार अशोक चव्हाण यांच्यामुळे झाला अशी चर्चा सुरू आहे. या विषयावर माजी केंद्रीय मंत्री भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या सूर्यकांता पाटील प्रतिक्रिया दिलीय. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांनी भाजपात आल्यामुळे त्यांचे मोठे राजकीय नुकसान झाल्याचे माजी केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांता पाटील म्हणाल्या. कुठल्याही पराभवाचे कारण एका नेत्यावर देऊन चालणार नाही. अशोक चव्हाण यांच्या मुळे भाजपाचा नांदेड जिल्ह्यत पराभव झाला असे कोणीही म्हणू शकत नाही, असे म्हणत सुर्यकांता पाटील यांनी अशोक चव्हाणांची पाठराखण केली आहे.

## पान १वरून...

### नीट परीक्षेबाबत आवाज

केली आहे. राहुल गांधी यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, ''नरेंद्र मोदींनी अद्याप शपथही घेतली नाही आणि परीक्षेतील अनियमिततेमुळे २४ लाखांहून अधिक विद्यार्थी आणि त्यांचे कुटुंब उद्ध्वस्त झाले आहेत. एकाच परीक्षा केंद्रातील ६ विद्यार्थी जास्तीत जास्त गुणांसह परीक्षेत अव्वल असतात, अनेकांना असे गुण मिळतात जे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसतात, परंतु सरकार सतत पेपर फुटण्याची शक्यता नाकारत आहे.

---------

### मुंबई बाजार समितीच

यानंतरही महसूल वाढविण्यात प्रशासनाला यश आले आहे.

वर्षभरात शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांची ४५ लाख रुपये थकबाकी वसूल करण्यात यश आल्याची माहिती बाजार समिती प्रशासनाने दिली आहे.

---------

### मोदी हॅट्ट्रीक; भारतवर्षात

होते. यापूर्वी १० वर्षे त्यांनी या खात्याचा पदभार सांभाळला आहे. गृथ आणि अर्थ खाते कोणाच्या वाट्याला येणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

---------

### मराठवाड्यासह कोकणवर

रावसाहेब दानवे, कपिल पाटील, नारायण राणे आणि भागवत कराड यांच्यासह जुन्या कॅबिनेटमधील २० मंत्र्यांना मंत्रिमंडळात स्थान नाही. काही हरलेले तर काही जिंकलेल्यांनाही मंत्रिमंडळातून वगळण्यात आले आहे. नारायण राणे हे राज्यसभेवर होते, तरी त्यांना कॅबिनेट मंत्री केले होते. आता ते रत्नागिरीतून निवडूण येऊनही त्यांना वगळले.

---------

### रामोजी राव

त्यासाठी, चंद्राबाबू नायडू आवर्जून उपस्थित होते. त्यांनी रामोजी राव यांच्या पार्थिवास खांदा देत निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले. दरम्यान, रामोजी राव यांच्या निधनानंतर बॉलिवूडसह दक्षिण भारतातील सेलिब्रिटींनी सोशल मीडियातून दु:ख व्यक्त केलं. महेश बाबू, रितेश देशमुख, जेनेलिया देखमुख यांनीही शोक व्यक्त करत आठवणींना उजाळा दिला.

---------

### पंकजा मुंडेंचा पराभव जिव्हारी

लातूर जिल्हयातील सचिन मुंडे यांचाही अपघाती मृत्यू झाला होता. त्याने निकालापुर्वी पंकजा मुंडे या निवडूण आल्या नाही तर सचिन गेला, असा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला होता. त्यामुळे सचिनने आत्महत्या केली की त्याचा अपघात झाला याबाबत अजून स्पष्ट माहिती मिळाली नाही.

-------------------

### तुम्हाला मुंडेसाहेबांची शपथ,

अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या लढतीत अखेर बजरंग सोनवणेंच्या गळ्यात खासदारकीची माळ पडली आहे. यानंतर बीड जिल्ह्यातील वातावरण तणावपूर्ण बनले असून पंकजा मुंडे यांच्याविषयी खालच्या स्तरावर जावून सोशल मिडीयावर पोस्ट केल्या जात आहेत. याच्या निषेधार्थ शिरूर, परळी तालुक्यात बंदची हाक देण्यात आली होती. बीडमध्ये पंकजा मुंडे समर्थक व बजरंग सोनवणे समर्थकांमध्ये सोशल वॉर रंगल्याचे दिसून आले. जिल्ह्यातील तणावपूर्ण शांततेत आज पंकजा मुंडेंनी कार्यकर्त्यांना व समर्थकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. स्वतः च्या जीवाला धक्का तोच लावेल ज्याला माझ्यावर प्रेम किंवा श्रद्धा नाही. मी लढत आहे, संयम ठेवत आहे, तुम्हीही सकारात्मकता दाखवा आणि संयमाने रहा. कोणी माझ्यासाठी जीव देणे कळतेय का किती कठीण आहे माझ्यासाठी? मला प्रचंड अपराधी आणि दु:खी वाटत आहे. पराभव मी स्वीकारला आणि पचवला आहे, पराभव तुम्हीही पचवा!! असे आवाहन पंकजा यांनी कार्यकर्त्यांना केलं आहे. तसेच, अंधाऱ्या रात्रीनंतर सुंदर प्रकाश असतो, तुम्ही माझ्या जीवनातील प्रकाश आहात.. शांत व सकारात्मक रहा. माझ्यासाठी मरण्यापेक्षा आपल्या उद्देशासाठी जगा. आई बापाला दु:ख देऊ नका. त्यांच्या जीवाला घोर लावू नका, तुम्हाला शप्पथ आहे मुंडे साहेबांची... असे ट्विट पंकजा मुंडेंनी केले आहे.

----------

### काश्मीरमध्ये भाविकांच्या बसवर

आणि बस दरीत कोसळली. ज्या भाागात हा हल्ला झाला तो परिसर राजौरी आणि रियासी जिल्ह्याच्या सीमेवर आहे. सुरक्षा दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून, परिसरात नाकाबंदी करण्यात आली आहे. एकीकडे मदतकार्य सुरू असून दुसरीकडे दहशतवाद्यांविरोधात शोधमोहीम देखील सुरू असल्याचे प्रशासनाने सांगितले.

----------

### मान्सून मुंबईत

होण्याची घोषणा केली होती. हवामान विभागाच्या शास्त्रज्ञांनी सांगितले की, मे-अखेर पश्चिम बंगाल आणि बांग्लादेशमधून आलेल्या रेमाल चक्रीवादळाने बंगालच्या उपसागराकडे मान्सूनचा प्रवाह खेचला, परिणामी ईशान्येकडील भागात मान्सूनची लवकर सुरुवात झाली. केरळ आणि ईशान्येवर एकाच वेळी मान्सूनची सुरुवात होणे अत्यंत दुर्मिळ आहे आणि यापूर्वी चार वेळा २०१७, १९९७,१९९५ आणि १९९१ साली असे घडले होते. केरळमध्ये १ जून आणि अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा, नागालँड, मेघालय, मिझोराम, मणिपूर आणि आसामसाठी ५ जून ही सामान्य मान्सून सुरू होण्याची तारीख आहे. १९७१ ते २०२४ दरम्यान, केरळमध्ये मान्सूनची सर्वात पहिली सुरुवात १९९० मध्ये झाली होती, जेव्हा वार्षिक पाऊस १८ मे रोजी किनारपट्टीच्या राज्यात पोहोचला होता. केरळमध्ये २२ मे १९९९ रोजी मान्सूनची सुरुवात झाली आणि १९७४ आणि २० मध्ये २३ मे रोजी झाली. एप्रिलचा अंदाज कायम ठेवत, दीर्घ-काळाच्या सरासरीच्या १०६% असा एकत्रित पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला. ईशान्य भारतात सामान्यपेक्षा कमी, वायव्य भागात सामान्य आणि देशाच्या मध्य आणि दक्षिण द्वीपकल्पीय प्रदेशात सामान्यपेक्षा जास्त पाऊस अपेक्षित आहे. देशातील बहुतेक पावसावर अवलंबून असलेल्या कृषी क्षेत्राचा समावेश असलेल्या भारताच्या कोर मान्सून झोनमध्ये या हंगामात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल, असेही हवामान खात्याने म्हटले आहे.

-----------

# राज्याच्या विविध भागात वादळी पाऊस

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याच्या विविध विविध भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. या पावसामुळं शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कारण शेतकरी अनेक दिवसापासून पावसाची वाट पाहत होते. मात्र, काही ठिकाणी वादळी पाऊस झाल्यामुळं शेती पिकांना फटका बसला आहे. नाशिक जिल्ह्यात वादळी पावसानं हजेरी लावली आहे. त्यामुळं अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत. तसेच या पावसामुळं कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठं नुकसान झालं आहे. कांदा व्यापाऱ्यांच्या शेडवरील पत्रे उडाले आहेत. त्यामुळं शेडमध्ये साठवून ठेवला कांदा भिजला आहे.**

नाशिक जिल्ह्यातील उमराणे परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. वादळी वाऱ्यामुळं रस्त्यावरील अनेक झाडे उन्मळून पडली आहेत. तसेच शेतशिवारात सर्वत्र पाणीच पाणी झाली आहे. कांदा व्यपाऱ्यांचे शेडचे पत्रे उडाले आहेत. या पावसामुळं शेडमध्ये साठवून ठेवलेला कांदा भिजला आहे. पहिल्याच जोरदार पावसामुळं बळीराजा सुखावला आहे. परभणी पाथरी, मानवत, सोनपेठसह जिल्ह्यात वादळी वारे, विजांचा कडकडाट अन जोरदार पाऊस बरसलाय. पाथरी तालुक्यातील पिंपळगाव शिवारात काही वृक्षही उन्मळुन पडले आहेत. एकूणच दिवसभर जाणवणाऱ्या उकाड्यापासून काहीसा दिलासा या पावसामुळे मिळाला आहे. सोलापूर शहरात तुफान पावसाला सुरुवात गेल्या तासाभरापासून सोलापूर शहरात तुफान पावसाला सुरुवात झाली आहे. शहरात अनेक रस्त्यांवर गुडघ्यापर्यंत पाणी साचलं आहे. सखल भागात पाणी साचल्याने शहरातील वाहतूक विस्कळीत झाली आहे. सांगली जिल्ह्यात जोरदार पाऊस सांगली जिल्ह्यात जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. या पावसामुळं अग्रणी नदीला पूर आला आहे. अनेक ओढे, नाले तुडुंब भरुन वाहत आहेत.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. १० जून २०२४ 

## दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

**बीड । प्रतिनिधी**



अखिल भारतीय नाथपंथी समाज आणि नाथमुद्रा प्रतिष्ठान तसेच नाथ मुद्रा बचतगट बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यातील वर्ग १० वी आणि वर्ग १२ वीच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार साईप्रसाद हॉटेल येथील हॉलमध्ये दि .१६/६/२०२४ रविवार रोजी ठीक १० वाजता करण्यात येणार आहे तरी सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ बीडचे कार्याध्यक्ष माननीय श्री संजय सावंत सर यांनी आवाहन केले आहे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्य सदस्य तसेच बीड येथील सुप्रसिद्ध डॉक्टर के बी पैठणकर तर अध्यक्ष मा गटविकास अधिकारी तसेच बीड जिल्हा महासंघ माननीय श्री भरत चव्हाण साहेब तसेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार विनोदाचार्य ह भ प जोगी महाराज यांच्या हस्ते होणार आहे बीड जिल्हा सचिव हरिभाऊ भराडी ग्रामीण अध्यक्ष रंगनाथ पैठणकर युवा अध्यक्ष भैरवनाथ शिंदे सर दत्ता शिराळकर डॉक्टर शिवनाथ सुरवसे माजी अध्यक्ष केदारनाथ चव्हाण सर प्रा. यादव सर, सरपंच बाबाजी पवार राज्य सदस्य जयश्रीताई चव्हाण यांच्या उपस्थितीत होणार आहे शिवाय यावेळेस नुकतेच सेवानिवृत्त झालेले माननीय राजकुमार शेळके साहेब सचिव यांचाही सपत्निक सत्कार करण्यात येणार आहे जिल्ह्यातील नाथ बांधवांनी उपस्थित रहावे.

# अंबाजोगाई - गित्ता- बर्दापूर मार्गे लातूरला जाणाऱ्या रस्त्याचा प्रश्न ३५ वर्षांनंतर मिटला ; राजेसाहेब देशमुख यांची यशस्वी शिष्टाई

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आज ही ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था दयनिय आहे. कोणीच वाली नसल्याने ग्रामीण रस्त्यांची दुरावस्था संपण्यास तयार नाही. परिणामी या खराब रस्त्यांमुळे दळण-वळण व्यवस्था विस्कळीत होते. अशीच काहीशी परिस्थिती तालुक्यातील अंबाजोगाई - गित्ता - बर्दापूर मार्गे लातूर जाणाऱ्या या रस्त्याबाबत ही होती. शेतकऱ्यांनी दुरूस्तीचे काम अडवल्याने या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडल्याने खड्यात रस्ता की, रस्त्यात खड्डा हेच कळत नव्हते. नागरिकांनी यापूर्वी वारंवार निवेदने देवून ही या रस्त्याच्या ठराविक ठिकाणची दुरूस्ती करण्यात मात्र प्रशासनाला यश आले नाही. पण, ही बाब जेव्हा बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांना समजली तेव्हा त्यांनी यशस्वी शिष्टाई केली. ज्यांची शेतजमीन या रस्ता दुरूस्ती कामात जाणार आहे. ते प्रगतशील शेतकरी चंद्रकांत गोपीनाथराव लोमटे नवाब व परिवाराने देखील नेहमीप्रमाणेच मोठे मन करून डांबरीकरण करण्यास संमती दिली. त्यामुळे तब्बल ३५ वर्षांनंतर काही ठिकाणी नादुरूस्त असलेल्या रस्त्याचा प्रश्न मिटणार असल्याने पंचक्रोशीतील नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.

अंबाजोगाई-गित्ता हा भारज, जवळगाव, दस्तगीरवाडी, तळेगाव, लिंबगाव, वाला, हातोला, बर्दापुर अशा अनेक गावांना व पुढे लातूर जिल्ह्याला जोडणारा महत्त्वाचा रस्ता आहे. रस्त्यालगत असलेल्या शेतकऱ्यांनी ठराविक ठिकाणी रस्ता दुरूस्ती काम अडवल्याने या रस्त्याची दुरावस्था झालेली होती. बैलगाडी, दुचाकी, एस.टी., ट्रॅक्टर, जीप, अशी अनेक वाहने या रस्त्यावरून ये-जा करतात. त्याच बरोबर या परिसरात शेती असल्याने शेतकऱ्यांना याच मार्गावरून जावे लागते. हा रस्ता खड्डेमय असल्याने वाहन चालकांची मोठी कसरत या ठिकाणी पहावयास मिळते. विशेषतः पावसाळ्यात तर चिखलामुळे या रस्त्याची मोठी दुरावस्था होते. रस्ता अडवलेल्या ठिकाणी मोठ-मोठे खड्डे पडल्याने हा रस्ता वाहनांसाठी धोकादायक ठरत होता. या रस्त्यावर पावसाचे पाणी गुडघ्याचे वर साचलेले असते. याच भागात शाळा असल्याने पायी चालत जाणाऱ्या



### डांबरीकरणास शेतकरी चंद्रकांत लोमटे, नवाब यांची संमती

शालेय विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना, महिलांना मार्ग काढणे अत्यंत अवघड जाते. हा रस्ता दुरूस्त करावा या मागणीचे निवेदन प्रशासनाला देवून या प्रश्नी लक्ष घालण्याची मागणी या परिसरातील नागरिकांनी अनेकवेळा केली होती. परंतु, रस्त्यालगत असलेल्या शेतकऱ्यांनी ठराविक ठिकाणी हा रस्ता अडवला होता. प्रशासनाने याकामी तोडगा काढण्यासाठी प्रयत्न ही केले. पण, त्यांना यश आले नाही. जेव्हा ही बाब बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांना समजली तेव्हा त्यांनी रस्त्यालगतचे लोमटे नवाब कुटुंबातील प्रगतशील शेतकरी चंद्रकांत गोपीनाथराव लोमटे व जयसिंग गोपीनाथराव लोमटे यांच्याशी संपर्क केला. संवाद साधला. प्रशासन व लोमटे नवाब परिवारात यशस्वी शिष्टाई केली. सामोपचाराने सकारात्मक चर्चा करून तोडगा काढला.

### दर्जेदार रस्त्यांमुळे ग्रामीण भागाचा विकास -देशमुख

**अंबाजोगाई-गित्ता-बर्दापूर मार्गे लातूरला जाणारा हा रस्ता मागील ३५ वर्षांपासुन काही ठिकाणी नादुरूस्त आहे. प्रशासनाला निवेदन दिले, वारंवार विनंत्या केल्या पण प्रश्न मिटत नव्हता. रस्त्याची दुरावस्था संपावी, जनतेची हेळसांड होऊ नये म्हणून आम्ही रस्त्यालगतचे लोमटे नवाब कुटुंबातील प्रगतशील शेतकरी चंद्रकांतराव लोमटे व जयसिंगराव लोमटे यांच्याशी संपर्क केला. संवाद साधला. बांधकाम विभाग व लोमटे नवाब परिवारात यशस्वी शिष्टाई केली. आम्हाला यश आले. नेहमीप्रमाणेच मोठे मन करून लोमटे नवाब परिवाराने अडवलेल्या ठिकाणच्या रस्ता दुरूस्ती कामाचे व डांबरीकरण करण्यास संमती दिली. या रस्त्याच्या दुतर्फा नवनवीन वसाहती मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामुळे सदरील रस्त्यावरील गर्दी सतत वाढत चालली आहे. या शिवाय हा रस्ता पुढे गित्ता - जवळगाव - बर्दापुर मार्गे पुढे लातुर जिल्ह्याला जोडणारा महत्त्वाचा रस्ता आहे. दर्जेदार रस्त्यांमुळे ग्रामीण भागाचा विकास होतो.**

देशमुख यांच्या मध्यस्थीला यश आले. नेहमीप्रमाणेच मोठे मन करून लोमटे नवाब परिवाराने अडवलेल्या ठिकाणच्या रस्ता दुरूस्ती कामाचे व डांबरीकरण करण्यास संमती दिली. त्यामुळे तब्बल ३५ वर्षांनंतर नादुरूस्त असलेल्या रस्त्याचा प्रश्न मिटणार आहे. बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख, दाजिसाहेब लोमटे, प्रगतशील शेतकरी चंद्रकांतराव लोमटे, जयसिंगराव लोमटे, सतिश नाना लोमटे, प्रा.भगवान शिंदे, दत्ता साळुंके (जवळगाव), किर्दंत सर, उपसरपंच विलास देशमुख, माजी सरपंच अमर शिंदे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ईश्वर शिंदे, व्यंकटेश चामनर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शेळके, विनोद गुरव, मुश्ताक पटेल (धायगुडा पिंपळा) आदींसह मान्यवरांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून रस्ता डांबरीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला. सदरील रस्ता डांबरीकरणाचा मार्ग मोकळा झाल्यामुळे पंचक्रोशीतील नागरीकांनी समाधान व्यक्त करून शेतकरी लोमटे नवाब परिवार, गंगाधरराव भोसले आणि राजेसाहेब देशमुख यांना धन्यवाद देत आहेत.

## आठवडमधील तरुणांद्वारे आठवड गावाचा इतिहास रचला

### आयआयटी इंजीनियरिंग क्षेत्रात आठवडच्या तरुणांची उत्तुंग भरारी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी आयआयटी मेन्स परीक्षेचा निकाल लागला. आणि आपण सर्वांनी त्यावेळी पाहिले की, आठवड मधील तीन तरुणांनी आयआयटी मेन्स मध्ये मोठे यश संपादन केले. आणि आता आठवडच्या याच तीन तरुणांनी आयआयटी ॲडव्हान्स ही जगातील दोन नंबरची अतिशय अवघड समजली जाणारी परीक्षा दिली. आणि या परीक्षेतही या तरुणांनी उत्तुंग यश संपादन करून आठवड गावाचा संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात इतिहास रचला.

आणि तो इतिहास म्हणजे



एका छोट्याशा गावातून एकाच वर्षी तीन तरुण आयआयटी साठी पात्र ठरले आहेत. आणि तेही चांगली रँक घेऊन. हा नगर तालुक्यातील आणि कदाचित अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमतःच घडलेला इतिहास आहे.

या गोष्टीचा आठवड गावाला निश्चितच अभिमान आहे. आणि त्याचबरोबर संपूर्ण नगर तालुक्यासाठी सुद्धा ही अभिमानाची गोष्ट आहे. उत्तुंग यश मिळविणारे आठवडचे ते तीन तरुण म्हणजे १) आठवडची सुकन्या कु. स्वामिनी संजय मोरे - रँक १७०३ २) आठवडचे सुपुत्र चि. उत्कर्ष गेनु मोरे - रँक २५५१ ३) आठवडचे सुपुत्र चि. प्रतीक संभाजी लगड - रँक २७१६

ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या *या तीनही यशस्वी तरुणांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे सर्व आठवड ग्रामस्थांच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन



### जोरदार पाऊस पडल्याने पेरण्या सुरु

**दिंद्रुड :- या वर्षी सुरवातीला पाऊस सलग चार दिवस आल्याने दिंद्रुड तसेच परिसरातील गावात पेरणीला वेग आला आहे, कापुस लागवड करण्यासाठी मजुर प्रत्येक शेतकरी यांना भेटत नाही यामुळे आत्ता कापुस लागवड पेरणी यंत्राने करताना जवळा येथे किशोर साबळे शेतकरी दिसत आहे. यामुळे कापुस लागवड हि लवकर होते याने वेळेत पेरणी होते.**

## महाराष्ट्र ग्रामीण बँकद्वारा बंगालीपिपळा येथे महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रा

**तांदळा । प्रतिनिधी**

शेतकरी वर्गाना पिक कर्ज नुतनीकरण, व्याज परतावा तसेच शासनाच्या प्रोत्साहनपर योजनेचे महत्त्व पटवून सांगण्यासाठी व त्यांच्यासोबत संवाद साधण्यासाठी महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचे दि, ५ जुन ते १५ दरम्यान आयोजन करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने गेवराई तालुक्यातील बंगालीपिपळा येथे दि. ९ जून रविवार रोजी महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

मराठवाड्यात तब्बल ५० ठिकाणी कार्यक्रम घेण्यात येणार असून या दरम्यान २००० नियमित पिक कर्ज धारकांचा सत्कार व २००० वक्षारोपन देखील बँके मार्फत करण्यात आले, सदर यात्रा ५ जुन पासुन छत्रपती संभाजीनगर येथुन सुरु झाली आहे यात्रेचा दि. १५ जुन रोजी नांदेड येथे समारोप होणार आहे. सदरील यात्रेचे दि, ९ जुन रोजी बंगालीपिपळा येथे आगमन झाले होते. दरम्यान महाराष्ट्र ग्रामीण बॅंक शाखा कोळगांव या कार्यक्षेत्रात येणाऱ्या बंगालीपिंपळा मध्ये कार्यक्रम घेतले.

यावेळी बँकेचे अध्यक्ष मिलिंदजी घारड बोलताना सांगितले की, ह्या कार्यक्रमाच्या माध्यमातून आपण जास्तीत जास्त बँकेपर्यंत नाळ जोडून जे काही अजूनही वंचित शेतकरी कर्जदार आहेत त्यांना बँकेपर्यंत पोहोचवून बँकेच्या विविध योजना लाभ शेतकऱ्यां पर्यंत पोहचविण्यासाठी हा प्रयत्न आहे. ते पुढे बोलताना म्हणाले विमा हि काळाची गरज आहे सध्या शहरांमध्ये लोक विमा काढतात परंतु खेड्यांमध्ये



जनजागृती नाही त्यासाठी प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना आणि दुसरी प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना मध्ये ४५६ रुपयांमध्ये आपल्याला ४ लाख रुपयांचा कव्हर मिळत आहे. आज शेतामध्ये काम करतांना शेतकऱ्यांच्या जिवीतास काही धोका झाला तर यासाठी विमा काढून घेतला पाहिजे आपल्याला प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना या योजनांमध्ये तुमचा कुठला एक्सीडेंटल किंवा अपघाती मृत्यू झाला तर त्याच्यामध्ये ते कव्हर होतं आणि मेडिक्लेम खेड्यांमध्ये खूप कमी घेतात आपल्या बँकेकडून मेडिक्लेम दिला जातो हॉस्पिटलमध्ये ज्यावेळेस आपण ॲडमिट होतो त्याचा खर्च खूप होतो त्यावेळी या विम्याचा आपल्याला लाभ होतो. पीककर्जामध्ये व्याज परतावाचं यामध्ये शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे कर्ज घेतल्यानंतर १ वर्षाच्या आत जर भरले तरच व्याज परवा मिळतो ३० जून नुतनीकरणकरण झालं पाहिजे आणि पुढच्या वर्षाच्या ३१ मार्च अगोदर पर्यंत भरलं पाहिजे परंतु हा तारखेचा गोंधळ जो आहे तो शेतकऱ्यांना लक्षात येत नाही. त्यामुळे जुलै ऑगस्टमध्ये कधीही कर्ज घेतलं तरी ते कर्ज ३१ मार्चच्या आत भरले पाहिजे यामुळे आपणस व्याज परतव्याचा लाभ मिळतो. यावेळी शेतकऱ्यांना पथनाट्याच्या माध्यमातून सायबर फसवणूक पीक कर्ज याविषयी योग्य मार्गदर्शन करण्यात आले. दरम्यान नियमित कर्जफेड करणार्या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. नियमित कर्जफेड करणार्या शेतकऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सहाय्यक सरव्यवस्थापक बी. एस. घोगरे

सहाय्यक सरव्यवस्थापक एस आर वानखेडे क्षेत्रीय व्यवस्थापक वाय. के. वानखेडे उपक्षेत्रीय व्यवस्थापक जी.जी. चिवटे कोळगाव शाखा व्यवस्थापक राजेश हिंगणेकर, नियोजन अधिकारी शैलेश शिंदे यावेळी या महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेत बॅंकेचे सर्व सन्मानिय ग्राहक, कोळगाव व बंगालीपिपळा येथील सरपंच प्रतिष्ठीत नागरीक, शेतकरी, बचत गटातील महिला वर्ग तसेच संबधित शासकीय अधिकारी, बँकमित्र अशोक खरात, अभिमान शेंबडे, सोमनाथ लोंढे, विजय तळतकर, माऊली खरे, संभाजी गलधर या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

## श्रीमती क्रांती खेडकर यांची यवतमाळ जिल्हा परिषद येथे शिक्षण विस्तार अधिकारीपदी निवड

**वडवणी । प्रतिनिधी**

परिस्थितीशी दोन हात करून नियतीला झुकवण्याचा संघर्ष करून यश मिळवणारे खरे विजेते असतात. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन आलेल्यांचे गोडवे गाण्यात अर्थ नसतो व्यक्ती शून्यातून विश्व निर्माण करून शकते. परिस्थिती अनुकूल असताना यशाचे टप्पे गाठणे तसे सोपे काम परंतु नेमकी त्याच्या उलट प्रतिकूल परिस्थितीतून एखादा टप्पा हा इतरांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरक ठरू शकतो. वडवणी येथील रहिवाशी आदर्श शिक्षिका श्रीमती खेडकर क्रांती महादेवराव ( घुगे) यांची यवतमाळ जिल्हा परिषद येथे शिक्षण विस्तार अधिकारी पदावर निवड झाली आहे. त्यांच्या निवडी बद्दल जिल्हा भरातुन शुभेच्छा वर्षाव होत आहे.क्रांती खेडकर यांच्याकडे अभ्यासू शिक्षिका म्हणून पाहिलं जातं अंगी जिद्द आणि चिकाटी अतिशय लहान वयापासून होती. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी मेहनत करणे हा त्यांचा जीवनाचा पाया राहिला आहे.. आज सुद्धा तेवढीच मेहनत करण्याची तयारी आहे.. आणि हीच मेहनत आज यशाच्या उच्च



शिखरावर येऊन ठेपली आहे.वडवणी येथील सरकारखोरी तांडा येथे नौकरी आसल्याने त्या पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना बंजारा भाषेत शिकवत असे दहा वर्षे पहिली ते चौथी च्या विद्यार्थ्यांना शिक्षण नंतर काही वर्षांनी त्यांची बीड तालुक्यातील मैंदा येथे बदली झाली नंतर दोन वर्षांनी त्यांनी यवतमाळ येथे सरळसेवा भरती २०२३..शिक्षण विस्तार अधिकारी पदाची परीक्षा दिली परीक्षा दिल्यानंतर काही महिन्यानंतर निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर केल्यानंतर तारीख निकाल लांबला आणि दिनांक ०७/०६/२०२४ रोजी रात्री निकाल लागला.निकाल लागताच सर्वच स्तरातून क्रांती खेडकर मॅडम यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.

आज मी मॅडम मुळेच पत्रकार - संभाजी लांडे

अभ्यासू शिक्षिका म्हणून क्रांती खेडकर मॅडम यांच्याकडे पाहिल जात. तर दुसरीकडे मी पहीली ते चौथी मी मॅडमच्या हाताखाली शिकलो. शाळा सोडल्यानंतर ही माझ्याकडून त्या मुला प्रमाणे अभ्यास करून घ्यायच्या. लिखाण, पाठांतर, लिखाण मुद्दे, बोलणे, पाठांतर, राजकीय, सामाजिक, भेदभाव, समाजभाव हा अभ्यास केल्यानंतर मला बीड येथे पत्रकारिता साठी डिग्री ही प्राप्त करून दिली. माझ पत्रकार होण्याचं श्रेय क्रांती खेडकर मॅडम यांचच आहे.

## राष्ट्रीय महामार्गावरील पुलाच्या कामाची आ. धस यांच्याकडून पाहणी

**आष्टी । प्रतिनिधी**

कडा येथील नगर बीड राष्ट्रीय महामार्गावरील पुलाचे काम अद्याप पूर्ण झाले नसुन या कामाची रविवारी आ.सुरेश धस यांनी पाहणी करुन लवकरात लवकर काम करण्यासाठीच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू झाले असून जुना पूल पूर्णपणे पाडून नष्ट केला आहे त्यामुळे मातीचा भराव टाकून दुसरी कडून वाहतूक वळवली आहे.मात्र जर कडा नदीला पाणी आले तर हा भराव वाहून गेल्यास राष्ट्रीय महामार्ग बंद पडू शकतो यासाठी आमदार सुरेश धस यांनी स्वतः रविवारी प्रत्यक्ष पुलाची पाहणी करून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता राजेंद्र भोपळे यांना लवकरात लवकर काम करून घेण्यासाठीच्या सूचना दिल्या.

आष्टी कडा साबलखेड या रस्त्याचे काम मागच्या वर्षी एप्रिल महिन्यापासून सुरू झाले. हे काम खूप संथ गतीने सुरू असल्याने या रस्त्यावरून प्रवास करणे मोठ्या जिकरीचे झाले आहे . कोणताही रस्ता सलगपणे पूर्ण झालेला दिसत नाही. त्यातच कडा येथे कडी नदीवर असलेला पूल पाडून तिथे नवीन



### पुलाचे काम तात्काळ करण्यासाठी अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

पुल बांधायचा आहे . रहदारीच्या दृष्टीने हा पूल महत्त्वाचा आहे. मात्र पुलाचे पाडकाम केल्यानंतर आतापर्यंत फक्त पूलाच्या भिंती अर्ध्या उंची एवढ्या बांधण्यात आलेल्या आहेत. आता पावसाळा सुरू झाला आहे. नदीला जर पाणी आलं तर हे काम पूर्ण कसे होईल हा ही प्रश्न आहेच. याशिवाय सध्या या मार्गावरील वाहतूक ज्या वळण रस्त्याने सुरू आहे तो रस्ता जर वाहून गेला तर नागरिकांनी येजा करायचे कसे हा ही मोठा प्रश्न आहे. त्यामुळे रविवारी आ.धस यांनी या कामावर भेट दिली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता राजेंद्र भोपळे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून नदीला पाणी आल्यास महामार्ग बंद होऊ शकतो यासाठी पुलाचे काम जलद गतीने करुन वाहतुकीसाठी पूल खुला करावा अशा सूचना दिल्या . यावेळी कडा गावचे सरपंच युवराज पाटील ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी ,उपसरपंच बाळासाहेब कर्डिले ,सामाजिक कार्यकर्ते अनिल तात्या ढोबळे ,रमेश शिरोळे,यांच्यासह कडा गावातील नागरिक उपस्थित होते.

कडा गावाच्या नागरिकांसाठी संपर्काच्या दृष्टीने आणि नगर बीड वाहतुकीसाठी कडी नदीवरील पूल महत्त्वाचा आहे. हा पुल लवकर बांधून पूर्ण झाला नाही तर सर्व वाहने धामणगाव किंवा शेरी खुर्द मार्गे जाण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

पान ६ वरून...

### शेतकऱ्यांच्या घरात गॅस

बि-बियाणे भरणा करण्यासाठी त्यांनी इकडुन-तिकडुन उसने पैसे जमा केले होते.त्यामुळे त्यांना घरदाराला सावरण्यासाठी आर्थिक परिस्थिती खुप अवघड झाले आहे.त्यामुळे प्रशासनाने या घटनेचा तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत करावी असे मागणी शेतकरी भाऊसाहेब सोळंके यांनी प्रशासनाला केली आहे.दरम्यान या घटनेमुळे भाऊसाहेब सोळंके यांच्या आईला खुप मोठा मानसिक धक्का बसला आहे.

### सोनार समाज हक्क परिषदेच्या

पत्रकार बांधवांतून मोठ्या उत्साहात अभिनंदन होत असून याप्रसंगी बोलताना श्री ज्ञानेश्वर पोतदार यांनी समाजासाठी आपण सतत सक्रिय राहून कार्य करू तसेच माझ्यावर सोपवलेल्या महत्त्वपूर्ण जबाबदारीचे योग्य पालन करून समाजासाठी कार्यरत राहू अशी प्रतिक्रिया निवडी प्रसंगी बोलताना त्यांनी व्यक्त केले आहे या नियुक्ती बद्दल राजाभाऊ महामुनी, रघुनाथ मैंदेकर, सतीश वेदपाठक, बंडू वेदपाठक, भागवतराव वेदपाठक, बाबुराव चिंचाळकर, बलभीम चिंचाळकर, माजी जिल्हाध्यक्ष बाबासाहेब महामुनी, अशोकराव बारस्कर, बंडू अण्णा चिंचाळकर, डॉ. सत्यप्रेम हवेलीकर, यांच्यासह सर्व समाज बांधवांनी या निवडीबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत

# उजनी धरणात पाण्याची वाढ, नीचांकी पातळी वधारण्यास सुरुवात

मान्सून महाराष्ट्रात दाखल झाल्यानंतर विविध भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. काही भागात पावसामुळं जनजीवन विस्कळीत देखील होत आहे. दरम्यान, या पावसामुळं नदी नाले तसेच धरणांच्या पाणी पातळीत वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी वरदायीनी असलेल्या उजनी धरणात पाणी येण्यास सुरुवात झाली आहे. धरणानं निचांकी पातळी गाठली होती, ती आता वधारण्यास सुरुवात झाली आहे.

**धरणात जवळपास १ टीएमसी पाण्याची वाढ**

यंदाच्या भीषण दुष्काळी स्थितीमुळं उजनी धरण ४४ वर्षाच्या नीचांकी पातळीला गेले होते. एका बाजूला चिंता वाढत चाललेली असताना गेल्या तीन ते चार दिवसापासून सुरु झालेल्या पावसामुळं धरणात जवळपास १ टीएमसी पाण्याची वाढ झाली आहे. यंदा उजनीने सर्वात नीचांकी म्हणजे वजा ५९.९९ टक्के पातळी गाठल्याने



प्रशासन आणि बळीराजाची चिंता वाढली होती. यातच नीचांकी पातळीमुळे उजनीवरील सर्व योजना जवळपास बंद पडल्या होत्या. मात्र गेल्या चार दिवसापासून मान्सूनच्या आगमनाने जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे.

**दोन दिवसापासून उजनी धरणात पाणी जमा होण्यास सुरुवात**

गेले काही दिवस सातत्याने घट होत असलेली पाणी पातळी पहिले दोन दिवस स्थिर राहिली.गेल्या दोन दिवसापासून उजनी धरणात पाणी जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

सध्या उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरु झालेल्या जोरदार पावसामुळे धरणात एक टीएमसी एवढे पाणी आले आहे. आज उजनी धरणाची पातळी वजा ५८.३० इतकी वधारली आहे. यंदा समाधानकारक पावसाचे अंदाज हवामान खात्याकडून मिळाले असल्याने बळीराजा लवकरात लवकर उजनी धरण भरण्याची देवाला प्रार्थना करत आहे. सोलापूर जिल्ह्यात मोठ्या पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. सध्या सुरु झालेल्या पावसामुळे प्रशासनावरील ताण देखील कमी झाला आहे.

## मान्सून मुंबईत दाखल, हवामान विभागाची घोषणा

मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. अखेर आज (९ जून) मान्सून मुंबईत दाखल झाला आहे. हवामान विभागानं मुंबईत मान्सून दाखल झाल्याची घोषणा केली आहे. सर्वसामान्यपणे ११ जून रोजी मान्सून मुंबईत दाखल होत असतो. मात्र, यावर्षी दोन दिवस आधीच मान्सून दाखल झाला आहे. त्यामुळं मुंबईकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल**

दरम्यान, ६ जून रोजीच मान्सून कोकणात दाखल झाला होता. त्यानंतर तीन दिवसांनी म्हणजे आज (९ जून) मान्सून मुंबईत दाखल झाला आहे. आता हळूहळू मान्सून राज्याच्या इतर भागातही सक्रिय होईल. दरम्यान, राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. पावसासाठी सर्वत्र पोषक वातावरण तयार झालं आहे. दरम्यान, सध्या राज्याच्या विविध भागात चांगला पाऊस कोसळत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. काही भागात जोरदार पावसानं हजेरी लावल्यानं जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, आजही राज्यात जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

आज 'या' भागात जोरदार पावसाची शक्यता : आज कोकणासह मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच मराठवाड्यातील काही जिल्ह्यातही पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आलाय. तसेच सिंदुधुर्ग आणि कोल्हापूर या दोन जिल्ह्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीव नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी असं आवाहन प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढला : दरम्यान, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढला आहे. मुंबई, पुणे, कोकण, विदर्भात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. शनिवारी मुंबई आणि उपनगरात ढगांच्या गडगडाटासह हलका पाऊस झाला होता. तर पुणे शहरात ढगफुटी सदृश्य परिस्थिती पाहायला मिळाली होती. पुण्यात अनेक भागात पावसामुळं जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळालं होतं. पहिल्याच मोठ्या पावसात पुणेकरांना अडचणींचा सामना करावा लागल्यानं नागरिकांनी संताप देखील व्यक्केला होता. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार , राज्यातील इतर भागात देखील येत्या २ दिवसात वरुणराजाचे जोरदार आगमन होणार आहे. त्यामुळं शेतकऱ्यांसह नागरिकांमध्य आनंदाचे वातावरण आहे.



## ही कोंबडी वर्षाला देते २०० अंड्यांची गॅरंटी



भारतात कुक्कुट पालनाचा व्यवसाय करणाऱ्यांसाठी एक कोंबडी चांगलीच फायदेशीर ठरणारी आहे. या कोंबडीचे पालन केल्यास उत्तम फायदा होण्याची गॅरंटी आहे. बेरोजगार तरुणांना कुक्कुट पालनासाठी महाराष्ट्र राज्य सरकारकडून बँकेचे कर्ज मिळत असते. त्यामुळे ज्यांना कमी भांडवलात कुक्कुट पालनाचा व्यवसाय करायचा असेल त्यांच्यासाठी ही कोंबडी चक्क वरदान ठरणारी आहे. कुक्कुट पालनाचा व्यवसाय फायदेशीर ठरण्यासाठी जशी बॉयलर कोंबडी उपयोगी ठरते तशी कॅरी निर्भीक नावाच्या जातीची कोंबडी एकदम फायद्याची ठरते. काय आहे या कोंबडीचे वैशिष्टये पाहूयात.

भारतात अंडी आणि कोंबडी मांसाची मागणी वाढत आहे. त्यामुळे कुक्कुटपालन हा शेतकऱ्यांसाठी उत्तम जोडधंदा ठरत आहे. पोल्ट्री फार्म टाकणे हा कमी भांडवलात मोठी कमाई करण्याचा हा एक चांगला मार्ग आहे. वाढती लोकसंख्या आणि कमी होत असलेला रोजगार यामुळे आजकाल तरुण शेतीबरोबरच आता पशुपालन व्यवसाय जोडधंडा स्वीकारत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. कुक्कुट पालनात अंडी आणि मांस अशा दोन्ही प्रकारचे उत्पन्न मिळते. आणि जागाही फारशी लागत नाही. रोजगाराच्या शोधात असलेले बेरोजगार तरुण आता कुक्कुट पालनाकडे वळले आहेत.

कोंबड्यांमध्येही अनेक प्रकारच्या जाती आढळतात. ज्या त्यांच्या गुणवत्तेसाठी ओळखले जातात. यापैकी एक कोंबडीची जात आहे ती म्हणजे कॅरी निर्भीक जात होय. या कोंबडीचे मांस उत्तम दर्जाचे असते. आणि अंड्यांच्या पैदास करण्यासाठी ही कोंबडी इतर कोंबड्यापेक्षा वरचढ आहे. कोंबडीच्या या खास जातीचे पालनपोषण करून कुक्कुटपालन करणारे लघु उद्योजक चांगला नफा कमवू शकतात. चला मग पाहूयात कुक्कुट प्राणी तज्ज्ञांकडून जाणून घेऊयात या भन्नाट अंडी देणाऱ्या कोंबडीच्या या खास जातीबद्दल.

**२० आठवड्यांत तयार होते**

कॅरी निर्भिक ही कोंबडीची एक देशी जात आहे, जिचे मांस प्रथिने गुणधर्मांनी समृद्ध आहे. ही कोंबडी अतिशय चपळ असते, आकाराने मोठी, ताकदवान, दिसायला देखणी, स्वभावाने लढाऊ आणि मजबूत प्रतिकार शक्तीची असते. सुमारे २० आठवड्यांच्या आतच या कोंबड्यांचे वजन १८४७ ग्रॅमपर्यंत पोहोचते. दरवर्षी या कोंबड्या तब्बल १९० ते २०० अंडी देतात. आणि प्रत्येक अंड्यांचे वजन ४५ ग्रॅम असते. कॅरी निर्भीक कोंबड्यांचा पोल्ट्री फार्म सुरू करून कमी खर्चात शेतकऱ्यांना दामदुप्पट नफा कमाविता येऊ शकतो असे रायबरेलीतील शिवगढ शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालयचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. इंद्रजित वर्मा यांनी म्हटले आहे. इंडो जर्मन यांच्या संयुक्त प्रयत्नातून या कोंबडीची जात साल २००० मध्ये विकसित करण्यात आली होती.

# दुधाला ३४ रुपये दर देण्याच्या विखे पाटलांच्या घोषणेचं काय झालं ?

## दुध उत्पादकांना दिलासा द्या, अन्यथा पुन्हा एल्गार, किसान सभा आक्रमक

सध्या राज्यातील दुध उत्पादक शेतकरी अडचणीत आहेत. कारण दुधाच्या दरात सातत्यानं घसरण होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. याविरोधात विविध शेतकरी संघटनांसह किसान सभा आक्रमक होताना दिसत आहे. कारण सध्या दुधाला २५ रुपयांचा दर मिळत आहे. यामुळं शेतकरी आक्रमक झाले आहेत. त्यामुळं सरकारनं तातडीनं याची दखल घेऊन दुध उत्पादकांना दिलासा द्यावा, अन्यथा पुन्हा एकदा एल्गार करावा लागेल असा इशारा किसान सभेचे नेते डॉ. अजित नवलेंनी दिलाय.

**दुधाला किमान ३४ रुपये दर अशी घोषणा दुग्ध विकासमंत्री विखे पाटलांनी केली होती**

दुधाचे दर सातत्याने कोसळत असल्याने दुध उत्पादक शेतकरी अक्षरशः हैराण झाले आहेत. दुध आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दुधाला किमान ३४ रुपये दर दिला जाईल अशी घोषणा दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली होती. प्रत्यक्षात मात्र आज दुधाला केवळ २५ रुपये दर मिळत असल्याचे अजित नवले म्हणाले.



आंदोलनामुळं सुरु करण्यात आलेले दुध अनुदानही सरकारने बंद केले आहे. दुध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये यामुळं मोठा असंतोष खदखदत आहे. राज्य सरकारने या असंतोषाची तातडीने दखल घेऊन दुध उत्पादकांना दिलासा द्यावा अन्यथा पुन्हा आंदोलनाच्या मार्गाने जावे लागेल असा इशारा किसान सभा व दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने दिला आहे.

प्रतिलिटर किमान १० रुपये अनुदान द्यावे: दुध उत्पादकांच्या आंदोलनाचा परिणाम म्हणून राज्य सरकारने दुधाला प्रतिलिटर ५ रुपये अनुदानाची घोषणा केली होती. मात्र, हे अनुदान केवळ ६ आठवडे म्हणजेच केवळ २ महिने दिले गेले. दुधाला आज मिळणारा दर पहाता हे अनुदान पुन्हा सुरु करावे, दुध उत्पादकांचा वाढता तोटा व वाढता उत्पादनखर्च पाहता अनुदानामध्ये वाढ करून अनुदानाची रक्कम प्रतिलिटर किमान १० रुपये करावी. तसेच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ११ जानेवारी ते १० मार्च या काळात केवळ अनुदान दिले गेले. पुढील चार महिने अनुदान बंद आहे. बंद काळातील अनुदानासह थकीत अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने वर्ग करावे, अशी मागणी किसान सभा वआणि दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने केली आहे.

**पशुखाद्याच्या दरात वाढ, चाऱ्याची टंचाई**

राज्यात पशुखाद्याचे दर सातत्याने वाढत आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चाऱ्याची राज्यात तीव्र टंचाई आहे. औषधोपचार व अनुषंगिक खर्च वाढल्याने दुधाचा उत्पादनखर्च सहन करण्याच्या पलीकडे गेला आहे. राज्य सरकार व राज्याचे दुग्धविकास मंत्री मात्र अजूनही निवडणुकीच्या माहोलमधून बाहेर येताना दिसत नाहीत. अशा पार्श्वभूमीवर अखेर दुध उत्पादकांना तीव्र आंदोलना शिवाय पर्याय राहणार नाही असे अजित नवले म्हणाले.




**जागतिक दिवस**
**बॉलपॉईंट पेन दिवस**
**जागतिक दृष्टीदान दिन.**

### महत्वाच्या घटना

१७६८ : माधवराव पेशवे आणि राघोबादादा यांच्यामधे धोडपची लढाई झाली. त्यात राघोबादादा पराभूत झाला.
१९१८ : पहिले महायुद्ध – इटलीच्या छोट्या मोटारबोटीने टोरपेडो मारुन हंगेरीची बॅटलशिप एस.एम.एस. इस्तवान बुडवली.
१९२४ : इटलीच्या समाजवादी नेता ज्याकोमो मॅट्टेओटी यांची हत्या.
१९३५ : ॲक्रन, ओहायो येथे बॉब स्मिथ व बिल विल्सन यांनी 'अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस' या संस्थेची स्थापना केली.
१९४० : दुसरे महायुद्ध – नॉर्वेने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४० : दुसरे महायुद्ध – इटलीने फ्रान्स व इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४४ : ओराद-सुर-ग्लेनची कत्तल, स्त्री बालकांसह ६४२ व्यक्तींची हत्या.
१९६६ : 'मिग' या जातीच्या विमानांची नाशिक येथे निर्मिती.
१९७७ : ॲपल कॉम्प्युटर्सने आपला 'ॲपल-' हा संगणक विकण्यास सुरूवात केली.
१९८२ : पासून दृष्टीदिन महाराष्ट्र राज्यात साजरा केला जातो.
१९९९ : उस्ताद झाकीर हुसेन यांची अमेरिकेतील प्रतिष्ठाप्राप्त 'नॅशनल हेरिटेज गौरववृत्ती' साठी निवड
२००३ : स्पिरिटरोव्हर मंगळाकडे रवाना.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२१३ : फख्रुद्दीन 'इराकी' पर्शियन तत्त्वज्ञ
१८७३ : स्वामी विराजनंदा – भारतीय तत्ववेत्ता,लेखक
१८९० : भारतीय सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न सन्मानित भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ता व राजकारणी तसचं, आसाम प्रांताचे शेवटचे पंतप्रधान व आसाम राज्याचे पहिले मुख्यमंत्री गोपीनाथ बोरदोलोई यांचा जन्मदिन.
१९०६ : गुलाबदास हरजीवनदास ब्रोकर – गुजराती लेखक व समीक्षक, पद्मश्री (१९९१), गुजराती साहित्य परिषदेचे अध्यक्ष, गुजरातीतील मनोविश्लेषणात्मक कथेची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. (मृत्यू: २० सप्टेंबर १९०९ पोरबंदर, सौराष्ट्र, गुजरात)
१९०८ : भारताचे लष्करप्रमुख, हैदराबादचे लष्करी प्रशासक व भारताचे कॅनडातील राजदूत, पद्मविभूषण जनरल जयंतीनाथ चौधरी यांचा जन्म. (मृत्यू: ६ एप्रिल १९८३)
१९१५ : सौल बेल्लो – नोबेल पारितोषिक विजेते लेखक
१९१६ : डंचिन डोनट्स चे स्थापक विल्यम रोसेनबर्ग यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर २००२)
१९२४ : के. भालचंद्र – नेत्रशल्यविशारद (मृत्यू: १९८९)
१९३८ : राहुल बजाज – बजाज उद्योग समूहाचे प्रमुख.
१९३८ : भारतीय गणितज्ञ आणि शैक्षणिक वासंती एन. भाट नायक यांचा जन्म. (मृत्यू: १२ फेब्रुवारी २००९)
१९५५ : वेद प्रकाश शर्मा – भारतीय लेखक
१९५५ : प्रकाश पदुकोण – ऑल इंग्लंड चॅम्पियनशिप जिंकणारा पहिला बॅडमिंटनपटू
१९५८ : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यिक व समाजसेवक अनुप सेठी यांचा जन्मदिन.
१९६० : नंदामुरी बालकृष्णा – भारतीय चित्रपट अभिनेते, राजकीय नेते
१९७२ : प्रसिद्ध भारतीय अमेरिकन व्यावसायिक कार्यकारी अधिकारी, अल्फाबेट इंक चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गुगल चे व्यवस्थापकीय कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई यांचा जन्मदिन.
१९८१ : सर्वोत्कृष्ट भारतीय खेळाडूचा भारतीय खेल रत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार आणि पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध सुवर्ण पदक जिंकणारे पहिले भारतीय पॅराऑलम्पिक भाला फेकपटू देवेंद्र झाझरिया यांचा जन्मदिन.
२००० : जगातील सर्वोच शिखर माउंट एवरेस्ट ची मोजणी करणाऱ्या व ते शिखर केवळ एक वर्ष आणि अकरा महिन्यात सर करणाऱ्या विश्वातील पहिली युवा गिर्यारोहिका भारतीय युवा गिर्यारोहिका मालावथ पूर्णा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३६ : आंद्रे ॲम्पिअर – फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १७७५)
१८७७ : रामनाथ टागोर – भारतीय समाजसुधारक
१९०३ : लुइगी क्रेमॉना – इटालियन गणितशास्त्रज्ञ.
१९०६ : गुजराती लेखक समीक्षक गुलाब दासब्रोकर यांचे निधन.
१९४९ : सिग्रिड उंडसेत, नोबेल पारितोषिक विजेते लेखक
१९५५ : भारतीय-अमेरिकन गोल्फर मार्गरिट ॲबॉट यांचे निधन. (जन्म: १८७८)
१९५७ : भाई विर सिंघ, भारतीय पंजाबी लेखक,कवी. लुइगी क्रेमॉना, इटालियन गणितशास्त्रज्ञ.लुइगी क्रेमॉना, इटालियन गणितशास्त्रज्ञ.
१९७६ : पॅरामाउंट पिक्चर्स चे सहसंस्थापक ॲडॉल्फ झुकॉर यांचे निधन. (जन्म: ७ जानेवारी १८७३)
१९८७ : प्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता जीवन यांचे निधन.
२००१ : फुलवंताबाई झोडगे – सामाजिक कार्यकर्त्या, सावित्रीबाई फुले यांचा वारसा विसाव्या शतकातुन एकविसाव्या शतकापर्यंत नेण्याचे कार्य झोडगेअक्कांनी केले.
२००६ : गुलाबदास हरजीवनदास ब्रोकर – गुजराती लेखक व समीक्षक, पद्मश्री (१९९१), गुजराती साहित्य परिषदेचे अध्यक्ष, गुजरातीतील मनोविश्लेषणात्मक कथेची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते.
२०१९ : गिरीश कर्नाड – ज्ञानपीठ पुरस्कार विजेते अभिनेते व दिग्दर्शक (जन्म: १९ मे १९३८)

# एआयएमआयएमचे हम दो हमारे बारह चित्रपटाविरोधात निवेदन

बीड । प्रतिनिधी

वादग्रस्त चित्रपट 'हम दो हमारे बारह' बीड जिल्ह्यात प्रदर्शित होऊ देणार नाही असा इशारा एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांनी दिला होता तसेच बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना निवेदन देऊन हा चित्रपट जिल्ह्यात प्रदर्शित होऊ देऊ नये अशी विनंती ही केली होती तेव्हा पोलीस अधीक्षकांनी बीड जिल्ह्यात हा चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही असे आश्वासन दिले होते. याला अनुसरून दिनांक सात जून २०२४ रोजी प्रदर्शित होणारा हा चित्रपट बीड जिल्ह्यात प्रदर्शित करण्यात आला नाही म्हणून शफिक भाऊंनी जिल्हा प्रशासन पोलीस प्रशासनासह चित्रपटगृह चालकांचे आभार व्यक्त केले आहे.

'हम दो हमारे बारह 'हा समाजासमाजात कलह आणि वाद निर्माण करणारा चित्रपट असल्याने समाजात शांतता भंग होण्याचा धोका होता. हा चित्रपट बीड जिल्ह्यात प्रदर्शित होऊ देणार नाही असे एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांनी म्हटले होते. याविषयी एआयएमआयएम पक्षाकडून बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक भाऊ यांनी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर



यांना निवेदन देऊन राष्ट्रपती, गृहमंत्री, केंद्रीय फिल्म प्रमाणन बोर्ड (सेन्सर बोर्ड) चे चेअरमन, केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, आणि गृहमंत्री यांनाही निवेदन पाठविले होते. हा चित्रपट इस्लाम धर्म व मुस्लिम समाजाविषयी चुकीचे चित्रीकरण करून बनविण्यात आलेला आहे. आणि विशेष करून मुस्लिम समाजातील महीलांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला होता. मुस्लिम समाज व इतर जाती मध्ये विष पेरण्याचे कारस्थान अशा चित्रपटाद्वारे करण्यात येत होते या पूर्वीही कश्मीर फाइल्स, द केरला स्टोरी सारखे चित्रपट इस्लाम धर्म व मुस्लिम महिलांवर ताशेरे ओढणारे होते. धर्म कोणताही असो त्यात इतर धर्मियांनी नाक खूपसून कोणताही एक धर्म किंवा त्या धर्मात असलेल्या आचारसंहितेचे चुकीच्या पद्धतीने प्रदर्शन करू नये.' हम दो हमारे बारह 'या चित्रपटात नेमके तेच करण्यात आले होते. चित्रपट बनविणाऱ्यांची ही कृती इस्लाम धर्मासह मुस्लिम समाजाला विनाकारण बदनाम करण्याचे षडयंत्र होते. यामुळे मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला होता. हा चित्रपट जर चित्रपटगृह मध्ये प्रदर्शित करण्यात आला तर शांतता भंग होण्याची व अनुचित प्रकार घडण्याची शक्यता होती. म्हणून राष्ट्रीय अध्यक्ष खा बॅरिस्टर असदुद्दीन औवैसी साहेब, प्रदेश अध्यक्ष मा.खा ईम्तियाज जलील साहेबाला, कार्याध्यक्ष डॉ गफ्फार कादरी साहेब, मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला साहेब यांच्या आदेशानुसार शफिक भाऊंनी इस्लाम आणि मुस्लिमांविषयी गरड ओकणारा 'हम दो हमारे बारह' हा चित्रपट बीड जिल्ह्यात प्रदर्शित करू नये, या चित्रपटावर कायमस्वरूपी बंदी घालावी. हा चित्रपट निर्माण करणारा निर्माता, बनविणारा दिग्दर्शक आणि यातील कलाकारांवर गुन्हे दाखल करण्यात यावो. अशी मागणी ही एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांनी केले होते. जर हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आलाच तर एआयएमआयएम पक्ष लोकशाही मार्गाने हा चित्रपट बंद पाडेल, असा इशाराही शफिक भाऊंनी दिला होता. तसेच या चित्रपटाविषयी ॲड. शेख शफीक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने कर्तव्यदक्ष बीड जिल्हा पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकुर यांची भेट घेऊन या चित्रपटाविषयी निर्माण झालेली जनभावना विषद केली होती. तेव्हा पोलिस अधीक्षकांनी सकारात्मक प्रतिसाद देत बीड जिल्ह्यात हा चित्रपट प्रदर्शित होणार नाही असे आश्वासन दिले. अन्? त्यांनी दिलेले आश्वासन पाडले ही. म्हणून शफिक भाऊंनी बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांसह जिल्ह्यातील चित्रपटगृह चालकांचेही आभार व्यक्त केले आहे. तसेच बीड जिल्हा एमआयएम जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, तालुका अध्यक्ष शहर अध्यक्ष, नगरसेवक यांचे पण आभार मानले.

# महावितरणला आली खासगी कंत्राटदारांकडून सामुग्री घेण्याची वेळ

लिंबागणेश । प्रतिनिधी

पावसाळ्यात वीजग्राहकांना अखंडीत व योग्य दाबाने वीजपुरवठा मिळावा यासाठी बीड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील वीजेची लोंबकळणा-या विद्युत तारा,वीजतारांजवळील झाडांच्या फांद्याची छाटणी, उघड्यावरील रोहित्रांची सुरक्षितता,आर्थिंग व टर्मिनल कनेक्शन चेक करणे, फुटलेले पिन, इन्सुलेटर बदलणे मान्सुनपुर्व देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात यावीत अशी लेखी तक्रार मे महिन्यात जिल्हा व महावितरण प्रशासनामार्फत ऊर्जा मंत्री यांना सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली होती.मात्र याकडे नेहमीप्रमाणेच दुर्लक्ष करण्यात आल्याचे दिसून येत असुन वादळीवाऱ्यासह पावसाने वीजेच्या तारा तुटणे त्यामुळे वीजपुरवठा खंडित होऊन ग्रामस्थांना रात्र अंधारात घालवावी लागत आहे.

काल दि.८ शनिवार रोजी रात्री वादळीवाऱ्यासह आलेल्या पावसाने लिंबागणेश येथील जिल्हा परिषद शाळेसमोरील विजेच्या तारा तुटून पडल्या त्यामुळे रात्रभर लिंबागणेश गाव अंधारात होते सकाळी महावितरणचे कर्मचारी चौरे आणि त्यांचे सहकारी तुटलेल्या विद्युत तारांची दुरुस्ती करण्यासाठी आले असता कार्यालयात विजेचे सामग्री नसल्याचे सांगितले. युवानेते विक्रांत वाणी आणि युवराज सुरवसे यांनी विजेची कामे करणारे खाजगी कंत्राटदार अंकुश गायकवाड यांच्याकडून मणी ,विद्युत तार आदि सामग्री उसणी मागवुन आणल्यानंतर दुरूस्तीचे काम सुरू झाले त्यामुळे एकंदरीतच



शेतकऱ्यांकडून सक्तिचे वीजबिल वसुली करणाऱ्या महावितरणला गरिबी आली की काय?? अशी उपहासात्मक चर्चा होती.

महावितरण कार्यालयात विजेची सामग्री नसल्याबद्दल डॉ.गणेश ढवळे यांनी उप अभियंता महावितरण लिंबागणेश कार्यालय यांच्याशी फोनवरून संवाद साधला असता वरिष्ठ कार्यालयास सामग्रीची मागणी केली असुन पाठपुरावा सुरू असल्याचे उत्तर मिळाले.रात्री अपरात्री वीज गेल्यावर महावितरणच्या कर्मचाऱ्यांना सुद्धा महावितरण सुरक्षा उपाय म्हणून आवश्यक साहित्य मिळत नसल्याने जीवावर उदार होऊन त्यांना काम करावे लागते हि दुर्दैवी बाब आहे.

# तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी बीडमध्ये यावे-युसूफ़

## बी.के. कॉलेज ऑफ फायर इंजीनियरिंग अँड सेफ्टी मॅनेजमेंटला आग्रह

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी बी.के. कॉलेज ऑफ फायर इंजीनियरिंग अँड सेफ्टी मॅनेजमेंटने बीड मध्ये यावे. येथे एमआयडीसी हव्या त्या प्रमाणात नसल्याने तसेच इतर उद्योगधंदेही नसल्याने जिल्हाभरातील सुशिक्षित तरुण-तरुणींना एक तर कुठेतरी अत्यंत तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागते किंवा बेरोजगार होऊन फिरावे लागते. जिल्ह्यातील हे चित्र पाहता औरंगाबाद येथील तरुण-तरुणींना अवघ्या एक ते दोन वर्षाच्या कोर्स नंतर शंभर टक्के नोकरीची हमी देणारे बी.के. कॉलेज ऑफ फायर इंजीनियरिंग अँड सेफ्टी मॅनेजमेंट ने बीडमध्ये येऊन येथेही शाखा सुरू करावी आणि येथील बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगार उपलब्ध करून द्यावा असा आग्रह औरंगाबाद येथील मुख्य शाखेत भेट दिल्यानंतर मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष बी.के. पठाण आणि प्राचार्य दीपक गायकवाड यांच्याकडे केला असता दोघांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला तसेच कॉलेजला भेट दिल्याबद्दल शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी सलमान खान पठाण, शेख मुबिनुद्दीन आणि शेख जाकीरुद्दीन उपस्थित होते.



याविषयी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे की, दहावी-बारावी नंतर इतर कोणतेही शिक्षण घ्यायचे म्हटल्यावर त्यावर अफाट खर्च करावा लागतो आहे. शिवाय नंतर नोकरी किंवा रोजगार मिळेलच याची शाश्वतीही राहिलेली नाही. मात्र फायर व सेफ्टी डिप्लोमा अत्यंत कमी पैशात होतो, वर्ष कमी लागतात तसेच कोर्स केल्याचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर महाराष्ट्रासह भारतातील इतर राज्यातही पटकन नोकरी मिळते. तसेच विदेशात जाऊन नोकरी करण्यास इच्छुक असलेल्यांना विदेशात जाऊनही नोकरी करता येते.

हा डिप्लोमा झाल्यानंतर कॉलेज व्यवस्थापनच नोकरीची हमी घेऊन नोकरी उपलब्ध करून देते. औरंगाबादच्या बी.के. कॉलेज ने सन २००८ पासून आजपर्यंत हजारो तरुणांना देश-विदेशात नोकरी उपलब्ध करून दिली आहे. यामुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. अनेकांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लागला आहे. तसेच आता शासकीय-प्रशासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालय, एमआयडीसी एरियातील कंपन्यांसह मोठ मोठी हॉटेल्स, मॉल्स, चित्रपटगृहे, मोठमोठ्या इमारती, अपार्टमेंट येथेही हा कोर्स केलेल्या तरुण-तरुणींना हमखास नोकरी मिळणार आहे तसेच फायर अँड सेफ्टी यंत्रणा व फायरमॅन शिवाय वर उल्लेख केलेल्या एकाही वास्तूला बांधकाम परवाना सुद्धा मिळणार नाही असे शासनाने जाहीर केले आहे. यामुळे या क्षेत्रात रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. हे पाहता बी.के. कॉलेज ऑफ फायर इंजीनियरिंग अँड सेफ्टी मॅनेजमेंट ने बीडमध्येही आपली शाखा सुरू करून येथील तरुणांना नोकरी उपलब्ध करून द्यावी. असा आग्रह मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी संस्थेचे अध्यक्ष बी.के. पठाण तथा प्राचार्य दीपक गायकवाड यांच्याकडे केला आहे. त्यांनीही याला सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच बीड मध्ये येऊन पाहणी करू असे आश्वासन दिले आहे.

# मुलीच्या जन्माचा पाटोद्यात रंगला स्वागत सोहळा

पाटोदा । प्रतिनिधी

नात झाल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी आजोबांनी नातीचा जन्मोत्सव साजरा केला. एकीकडे मुलगा म्हणजेच वंशाचा दिवा अशी मानसिकता असताना, दुसरीकडे अशाप्रकारे सकात्मक आणि आदर्श पावलंही उचलली जात आहेत.

पाटोदा शहरात एक अनोखा स्वागत सोहळा साजरा झाला. एक चिमुकली पाहुणी घरी येणार होती. तिच्या स्वागताला जाधव कुटुंब जणू आसुसलेलं होतं. सकाळपासून या चिमुकलीच्या आगमनाची वाट पाहत होते. ही पाहुणी दुसरी-तिसरी कुणी नसून दोन दिवसांपूर्वी जन्मलेली जाधव कुटुंबाची नात होती. आपल्या तान्हुल्या नातीच्या स्वागतासाठी तिच्या आजोबांनी मोठा समारंभ आयोजित केला होता.



पाटोदा तालुक्यातील कुसळब(हल्ली मुक्काम नाशिक) येथील शिवानी आबासाहेब पवार यांच्या पोटी कन्यारत्न जन्माला आलं.दि.३जुन रोजी बीड येथील खाजगी रुग्णालयात या मुलीने जन्म घेतला. मुलगी जन्माला आल्याचा आनंद या दाम्पत्य व आजोबा दिलिप जाधव यांच्या व कुटुंबीयांच्या गगनात मावत नव्हता. दवाखान्यातून घरी आणताना स्वागत समारंभ करण्याची योजना आजोबा दिलीप जाधव यांनी आखली. त्यांच्या कुटुंबीयांनी सुध्दा आनंदात हिरहिरीने भाग घेत फटाक्यांची आतिषबाजी रांगोळी,फुलांच्या पायघड्या घराची सजावट आदीं करण्यात आले. सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास लाडक्या लेकीचं आगमन झालं. फटाक्यांची आतषबाजी,औक्षण करुन या नव्या जीवाचं मोठ्या जल्लोषात स्वागत झालं. केवळ कुटुंबीय नाही तर नातलग, शेजारी या आनंद सोहळ्याचा भाग बनले होते. नवजात मुलीच्या आई-वडिलांना झालेला आनंद अवर्णनीय झाल्याचे दिसून आले.मुलीच्या जन्माचा स्वागत हा बदल समाजमनाला नवी दिशा देणारा आहे.पाटोदा शहरातील हा स्वागत सोहळा महाराष्ट्राला अनुकरणीय ठरावा असा आहे. तसं झालं तर लेक वाचवा अभियानाला खऱ्या अर्थाने गती येईल.

# संदिप खाकाळ यांच्या प्रयत्नातून वाघुले वस्ती रस्त्याचे स्वप्न साकार

कडा । प्रतिनिधी

शेरी बु सरपंच संदिप खाकाळ यांनी माजी राज्यमंत्री आ.सुरेश धस यांच्याकडे सतत पाठपुरावा करून वाघुले वस्तीवरील रस्ता अत्यंत खराब झालेला रस्ता मंजूर करू आणला असून या रस्त्याच्या कामाला सुरूवात झाली आहे. यामुळे वस्तीवरील नागरिकांनी सरपंच संदीप खकाळ यांचे आभार मानले आहेत.

शेतीमधील कमी होणारी मनुष्यबळाची उपलब्धता लक्षात घेता शेतीची कामे करताना यंत्रांचा उपयोग वाढला आहे. यांत्रिकीकरणामुळे शेतीमध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी व इतर कामे करण्यासाठी,यंत्रसामुग्री शेतापर्यंत नेण्यासाठी आणि शेतीमाल बाजारात पोहचविण्या करीता बारमाही शेतरस्त्यांची आवश्यकता असते.असे रस्ते तयार करून शेतकऱ्यांना सुविधा देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्यात 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.शासनाच्या या योजनेचा लाभ आपल्या गावातील लोकांना झाला पाहिजे त्यातून मजुरांच्या हाताला काम मिळाले पाहिजे व ज्या ठिकाणी रस्त्याची गरज आहे त्याठिकाणी रस्ता करण्यासाठी सरपंच संदिप खाकाळ हे सतत प्रयत्न करीत होते आज त्यांच्या सततच्या पाठपुराव्याने मंजूर झालेला अतिशय महत्त्वाचा व अनेक वर्षांपासून प्रलंबित केरूळ रोड ते वाघुले वस्ती पांदण रस्त्याचे आज श्री.संदिप साहेब खाकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. दशरथ (तात्या) गोरे व श्री.राहूल गोरे यांच्या हस्ते उद्घाटन करून रस्त्याला सुरुवात करण्यात आली. यावेळी उपसरपंच दिपक दादा सोनवणे,शिवाजी डोरले,परशुराम शिरोळे,चेअरमन नवनाथ वाघुले, दयानंद भालेकर,शिवाजी कन्हेरकर, बबन वाघुले, अमोल वाघुले, ज्ञानेश्वर गोरे, यांच्यासह इतर नागरिक उपस्थित होते

# बीडमध्ये तीन दिवसीय हरिपाठ प्रवचनमालेचा आजपासून प्रारंभ

बीड । प्रतिनिधी

हरीच्या दासा हरी दाही दिशा ! भावे जैसा तैसा हर एक !! श्रीसंत धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान बीड व श्रीमद्? जनीजनार्दन पाटंगण संस्थान, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने वै. वे.शा.स. धुंडीराजशास्त्री पाटंगणकर यांच्या तृतीय पुण्य स्मरणानिमित्ताने श्नीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या रसाळ, मधूर, अमृतवाणीतून आज सोमवार दि.१० जुन २०२४ ते बुधवार दि.१२ जुन २०२४ दरम्यान तीन दिवशीय प्रवचनमाला सायं. ०६.०० ते ०८.०० यावेळेत संस्थान थोरले पाटंगण, जुन्या तहसिल मागे, बीड येथे संपन्न होत आहे.

येथील पाटंगण संस्थान हे बीड शहराचे अध्यात्मिक भक्ती, शक्ती, उर्जा केंद्र असून श्रीमद्जनीजनार्दन थोरले पाटंगण संस्थानच्या वतीने वर्षभर विविध अध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रम सातत्याने होत

### भाविकभक्तांनी श्नवणाचा लाभ घ्यावा - पाटंगण संस्थानच्या वतीने आवाहन

असतात. परमपूज्य श्रीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या अमृतवाणीतून संपन्न होत असलेल्या संत एकनाथांचा हरिपाठ या विषयावरील तीन दिवशीय प्रवचनमालेस शहरातील महिला, पुरुष भावीकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्नवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीसंत सद्गुरू धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान बीड व श्रीमद्? जनी जनार्दन संस्थान थोरले पाटंगण, जुन्या तहसीलच्या मागे बीड यांच्या वतीने करण्यात आले असून प्रवचनमालेस येणाऱ्या वाहनांची व्यवस्था किल्ला मैदान परिसर, बलभीम चौक, बीड येथे करण्यात आले असल्याचे आयोजन समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# वडिलांच्या निधनानंतर १५ दिवसात दिली नीट परीक्षा

## जराकजान खानला ६१३ गुण; मान्यवरांच्या हस्ते सत्कार

बीड । प्रतिनिधी

शहरातील बार्शी रोडवर असलेल्या हिना पेट्रोल पंप समोर कर्नाटक राज्याच्या बिदर संचालित शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन बीड मध्ये गेल्या वर्षी नीट परीक्षेसाठी शिक्षण घेणाऱ्या १३ विद्यार्थ्यांमधून ०५ विद्यार्थी ५६० पेक्षा जास्त गुण घेऊन नुकतेच दिनांक ०४ जून रोजी जाहीर झालेल्या निकालात उत्तीर्ण झाले आहे. यात ज़राक़जान सुलतान खान ही विद्यार्थिनी ७२० पैकी ६१३ गुण मिळवून इन्स्टिट्यूशन मध्ये पहिली आली. विशेष म्हणजे तिचे वडील सुलतान खान यांचे दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजी अकस्मात निधन झाले होते. येथून १६ दिवसानंतर दिनांक ०५ मे २०२४ रोजी नीट ची परीक्षा होती. तरीही ज़राक़जानने आई आणि शाहीन इन्स्टिट्यूशनच्या शिक्षक वृंदांनी दिलेल्या धीराने ही परीक्षा दिली. आणि ७२० पैकी ६१३ गुण मिळवून इन्स्टिट्यूशन मधून पहिली आली. तसेच तिच्या सोबत नीट परीक्षा दिलेल्या शेख अमानिया ५९४, उम्मे अम्मारा ५८२, पठाण अक्सा ५७७, शेख लायबा ५६० या विद्यार्थिनींनीही उल्लेखनीय गुण मिळविले. यामुळे बीड येथील शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन मध्ये सुप्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट शेख समीर यांच्या हस्ते



ज़राक़जानसह विशेष गुण मिळविलेल्या सर्व विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख शेख निजाम, सर सय्यद विद्यालयाचे सचिव शेख वकील, शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनचे बीड शाखाप्रमुख प्रा. डॉ. इमरान खान, फिजिक्सचे प्रा. अजित कुमार, मॅथ्सचे प्रा. मुहम्मद असजद, बायोलॉजीचे प्रा.डॉ. ज़ुबेर मिर्ज़ा, ज्येष्ठ मार्गदर्शक मुज़्तबा खान सर आणि जुनैद सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत आपले मनोगत व्यक्त करताना ज़राक़जान म्हणाली की, आज या क्षणी मान्यवरांच्या उपस्थितीत माझा सत्कार होत असला यामुळे मी प्रसन्न असले तरी मला नुकतेच निधन पावलेल्या माझ्या वडिलांची खूप आठवण येत आहे. त्यांची खूप इच्छा होती की, मी नीट परीक्षेमध्ये चांगले गुण घेऊन उत्तीर्ण व्हावे आणि पुढे चालून एमबीबीएस करून डॉक्टर व्हावे. त्यांची ही इच्छा आई आणि येथील माझ्या वडीलधारी शिक्षकांच्या आशीर्वादाने व सहकार्याने करण्याचे बळ अल्लाहने मला द्यावे. येथून यापूर्वी नीट परीक्षेत उत्तम यश मिळवून गेलेले अमान अहेमद, नादिया फातिमा, रीमशा समीन यांच्यासारखेच मलाही एमबीबीएस करायचे आहे आणि एक डॉक्टर होऊन सर्वसामान्य गोरगरिबांवर उपचार करून रुग्णसेवा करायची आहे. याकरिता येथून पुढेही मला येथील शिक्षक वृंदाचे सहकार्य व साथ आवश्यक आहे असे म्हटले. मनोगत व्यक्त करताना तिचा कंठ दाटून आला होता आणि डोळ्यांतून अश्रू येत होते. ज़राक़जान चे वडील एक फोटोग्राफर होते. त्यांचा व्यवसाय प्रपंच चालविण्यासाठी सुद्धा अपुरा होता परंतु तिच्यात शिक्षण घेण्याची इच्छाशक्ती दृढ होती. तिने इथपर्यंतचे शिक्षण शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन आणि बीड येथील शिक्षकांच्या सहकार्याने घेतले.

# पापा सोळंके यांच्या प्रयत्नांमुळे दोन रुग्णांना मिळाली दोन लाखांची मदत



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील व शहरातील सर्वसामान्य गोरगरीब रुग्णांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ श्रीकांत शिंदे व कक्ष अधिकारी मंगेश चिवटे यांच्या सहकार्यामुळे मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मोठ्या प्रमाणात सहकार्य मिळत असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. माजलगाव येथील छगन एकनाथ क्षीरसागर हे मागील बरेच दिवसांनी हृदय रोगाने ग्रासलेले होते , ते उपचारासाठी पुणे येथील राम मंगल हार्ट फाऊंडेशन येथे ॲडमिट होते , त्यांच्या हृदय रोगावरील इलाजासाठी त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून एक लाखाची मदत मिळाली असून दुसरे रुग्ण अलीम अमीन कुरेशी हे मराठवाडा कॅन्सर हॉस्पिटल संभाजीनगर येथे केमो थेरीपी आणि रेडीएशन रोगावर इलाजासाठी त्यांना एक लाखाची आर्थिक मदत मुखमंत्री सहाय्याता निधीतून मिळाली आहे. सदरील रुग्णाची परिस्थिल अत्यंत बिकट असल्याने त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळाल्याने त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ श्रीकांत शिंदे व कक्ष अधिकारी मंगेश चिवटे यांचे आभार मानले असून मुख्यमंत्री सहाय्यता निधी मिळऊन देण्यासाठी विशेष प्रयत्न करणारे शिवसेना शहरप्रमुख पापा सोळंके यांचे आभार मानले आहे.

राज्य लोकतंत्र
सोमवार दि.१० जून २०२४ | ६

# सोशल मिडियावॉर ; सामाजिक सलोख्याचा बळी

## जातीची अस्मिता की विजयाची नशा? शिरूर पाठोपाठ परळी कडकडीत बंद

परळी । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर सोशल मीडिया वॉर चांगलाच रंगला असुन अति उत्साही तरुणाईकडून समाज माध्यमावर प्रक्षोभक पोस्ट केल्याने समाजात वितुष्ट निर्माण झाले आहे. भाजपा राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांच्या बद्दल समाज माध्यमावर करण्यात आलेल्या पोस्ट च्या निषेधार्थ रविवारी परळी शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.

समाज माध्यम हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याचे अनेक दाखले देता येतील.निर्भया हत्याकांड असो की अण्णा हजारे यांचे आंदोलन. समाज माध्यमातून मिळालेल्या पाठींबावर यश मिळालेले आहे.दोन वर्षापूर्वी शहरातील एक चिमुकली दुर्जर आजाराचा सामना करत



असताना याच समाज माध्यमातून मदतीचे हाक दिली असता हजारो हात पुढे येत लाखो रुपयांची मदत चिमुकलीच्या उपचारासाठी जमा झाली आजस्थितीत ही लहान मुलगी मृत्यूच्या जबड्यातून बाहेर पडली ही केवळ समाज माध्यमातून केलेल्या मदतीचा सहकार्याने.

### पालकांची भूमिका महत्वपूर्ण

**आजमितीला उच्च शिक्षण घेऊन ही रोजगार उपलब्ध नसल्याने तरुणाई मोबाईलच्या आहारी गेलेली आहे.त्यातच फेसबुक, इंस्टाग्राम , व्हाट्सअप या सारख्या समाज माध्यमामुळे अनेक गुन्हे घडल्याचे उदाहरणे आहेत.या सर्व परिस्थितीत पालक म्हणून जरी आपले पाल्य मोठे झालेले असले तरी त्याचे मोबाईल वापरावरील वर्तणूक ओळखून योग्य ते मार्गदर्शन व समुपदेशन करणे काळाची गरज बनली आहे.खोट्या अफवा, जाती-धर्माची अस्मिता याबद्दल समाज माध्यमावर आलेल्या पोस्टला आपला पाल्य बळी जाणार नाही याची काळजी पालकांनी घेणे गरजेचे आहे.**

मागील दोन वर्षांपासून जिल्ह्यात सामाजिक संतुलन मोठ्या प्रमाणावर खराब झालेले असून यातच लोकसभा निवडणुकीतील यश-अपयश त्यात भर टाकणारे आहे.लोकसभा निवडणुकीत पराभूत भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांच्या बद्दल आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या एका तरुणास गुरुवार दि ६ रोजी परळी पोलिसांनी ताब्यात घेतले असताना अहमदनगर जिल्ह्यातील एका इसमाने हीच पुनरावृत्ती केल्याने वंजारी समाज व ओबीसी समाजात चीड निर्माण झाली असून याचा निषेध मधून शिरूर कासार पाठोपाठ रविवार दि ९ रोजी परळी शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.हा बंद सकल ओबीसी समाजाकडून पुकारण्यात आला होता.बंद दरम्यान बाजार पेठ तर संपूर्णतः बंद होतीच मात्र रस्ते देखील निर्मनुष्य पहावयास मिळाले. घटनेचे गांभीर्य ओळखून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस प्रशासनाने महत्वाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

दरम्यान दुसरीकडे मराठा समाजाचे मनोज जरांगे पाटील यांच्याबद्दल प्रक्षोभक वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ बीड मध्ये निदर्शने करण्यात आली.एकूणच या सर्व परिस्थितीत जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, पराभूत उमेदवार पंकजा मुंडे, लोकसभा निवडणुकीत विजयी झालेले नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे यांनी समोर घेवून समाजात शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन केले असताना देखील अति उत्साही तरुणाई मात्र जातीच्या आणि विजयाच्या अंदाधुंद नशेत भान हरवून सोशल मीडियाचा वापर करून सामाजिक सलोखा बिघडविण्याचे काम करत आहे. सोशल मीडियावर जिल्हा पोलीस प्रशासनाची करडी नजर असून तरुणांनी अशा विघातक कृतीपासून दूर राहण्याचे आवाहन पोलीसाकडून देखील करण्यात आले आहे.

# बी- बियाणे, खतांची निर्धारित दरापेक्षा जादा दराने विक्री करु नये -आ.सुरेश धस



आष्टी । प्रतिनिधी

जूनच्या पहिल्याच आठवड्यात वरूण राजाने दमदार हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला असून उघडीप मिळाल्यावर खरीप हंगामाचे काम सुरू करणार आहे.लगेच तालुक्यातील शेतकरी वर्ग पेरणीच्या लगबगीला लागणार असून पेरणीसाठी आवश्यक बी-बियाणे आणि खतांसाठी मागणी वाढणार आहे.याचा गैरफायदा काही बी- बियाणे आणि खत विक्री करणारे विक्रेते घेतात आणि सरकारच्या निर्धारित दरापेक्षा जादा दराने विक्री करतात असे प्रकार होऊ नयेत शेतकऱ्यांना चढ्या भावाने बी-बियाणे,खते विक्री करू नये असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आहे.

या प्रसिद्धीपत्रकात पुढे आ.धस म्हणतात की,सरकारने निर्धारित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने पेरणी बी,बियाणे अथवा खतांची विक्री करत असल्यास एखादी कंपनी अथवा कृषी सेवा केंद्र वाढीव दरात खत विकत असल्यास त्याची माहिती आष्टी तहसील कार्यालय किंवा आष्टी तालुका कृषी कार्यालयात नेमणूक केलेल्या अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार करावी.तसेच बी-बियाणे, खते विक्री करणाऱ्या दुकानदारांनी चढ्या भावाने विक्री न करता राज्य सरकारने निर्धारित केलेल्या नियमांचे सर्व विक्रेत्यांनी पालन करावे.गतवर्षी पडलेल्या दुष्काळामुळे शेतकरी वर्ग आर्थिक संकटात असून चढ्या भावाने बी -बियाणे खते घेतल्याने आर्थिक संकटाचा बोजा शेतकऱ्यांना लादला जाऊ शकतो त्यामुळे असे न करता सर्व विक्रेत्यांना विनंती आहे की, शेतकऱ्यांची लूटमार न करता योग्य भावातच बी-बियाणे खते द्यावेत अशी विनंती आमदार सुरेश धस यांनी केली आहे.

### दूध उत्पादक शेतकऱ्यांनो मकाच्या पीक पेरणी व उत्पादनावर भर द्या -आ. धस

**आष्टी तालुक्यासह मतदारसंघात दूध उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच दूध उत्पादकांना आगामी काळात चारा टंचाई भासू नये म्हणून दूध उत्पादक शेतकऱ्यांनी मकेच्या पीक पेरणी व उत्पादनाकडे भर द्यावा आणि मुरघास करावा यातून चारा टंचाई व दूध उत्पादन वाढण्यासाठी प्रयत्न होईल. शेतकऱ्यांनी मका पीकाचे पेरणीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढवावे तर मुरघास करण्यासाठी लागणारे बॅग मागणीसाठी प्रत्येकाने गावचे सरपंच किंवा ग्रामसेवक यांच्याकडे लेखी मागणी करावे असेही आमदार सुरेश धस यांनी शेतकऱ्यांना केले आहे.**

# धनंजय मुंडेकडून राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी तक्रार व्हाट्सअप क्रमांक जारी



**बी-बियाण्यांची चढ्या भावाने विक्री, बोगस वाण विक्री, अनावश्यक खरेदीची सक्ती आदी बाबींची थेट तक्रार करता येणार; तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवणार**

मुंबई । प्रतिनिधी

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी एक दिवस आधी राज्याच्या खरीप हंगामाच्या नियोजनाचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांसाठी 'कृषी तक्रार व्हाट्सप हेल्पलाईन क्रमांक' जारी करण्याचे निर्देश दिले, त्याप्रमाणे कृषी विभागाकडून ९८२२४४६६५५ हा व्हाट्सप क्रमांक जारी करण्यात आला आहे.

राज्यात कुठेही कृषी निविष्ठा विक्रेते शेतकऱ्यांना विविष्ट कंपनीचे बियाणे किंवा खत घेण्याची सक्ती करत असतील, बी-बियाणे, खते किंवा कीटक नाशकांची चढ्या भावाने विक्री करत असतील, अनावश्यक वस्तू खरेदी करण्याची सक्ती करत असतील, एखादे बोगस वाण विक्री करत असतील, किंवा अशा काही तक्रारी असतील, त्या तक्रारी शेतकऱ्यांनी दुकानाचे नाव, ठिकाण झ तालुका, जिल्हा यांसह उपलब्ध असलेल्या पुराव्यासह वरील व्हाट्सप क्रमांकावर पाठवावेत. त्या प्रत्येक तक्रारीची तातडीने दखल घेऊन, त्याची शहानिशा करून त्यावर कारवाई केली जाईल, त्याचबरोबर तक्रार देणाऱ्या शेतकरी बंधू-भगिनींचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल, अशी माहिती धनंजय मुंडे यांनी दिली आहे. मागील वर्षी देखील धनंजय मुंडे यांनी हा अभिनव उपक्रम राबविला होता. त्याद्वारे हजारो तक्रारींची सोडवणूक करण्यास मदत मिळाली होती. त्यामुळे याही वर्षी हा उपक्रम राबविण्याचा निर्णय धनंजय मुंडे यांनी घेतला असून, सदर व्हाट्सप क्रमांक कार्यान्वित करण्यात आला आहे.

# पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांच्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर कारवाई करा

## दिंद्रुड परिसरातील सकल ओबीसींचे पोलिसांना निवेदन

दिंद्रुड । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे व कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या बद्दल सोशल मीडियावर चुकीच्या पोस्ट, कमेंट करून सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या समाजकंटकांवर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी तसेच यापुढे असे गैरप्रकार होऊ नये याबाबत खबरदारी घ्यावी. असे निवेदन दिंद्रुड पोलीस हद्दीतील सकल ओबीसी समाजाने पोलिसांना काल दि.०९ रविवारी दिले.



गेल्या काही दिवसांपासून समाजातील काही विघ्न संतोषी व समाजकंटकांकडून सोशल मीडियावर जातिवाचक तसेच पंकजा व धनंजय मुंडे यांच्या विषयी गलिच्छ भाषेत समाज माध्यमावर संदेश प्रसारित करून जाणीवपूर्वक गैरप्रकार करत समाजात सामाजिक वातावरण दूषित करण्याचे काम करण्यात येत आहे. यामुळे सामाजिक तेढ निर्माण होत दोन समाजात मानसिक वातावरण कलुषित करण्याचा प्रकार होत असल्याने पोलिसांनी अशा आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी पोलीस हद्दीतील ओबीसी बांधवांनी रविवारी पोलीस स्टेशन गाठत केली आहे.संबंधित समाजकंटकांवर आगामी काळात पोलिसांनी कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिंद्रुड पोलिसांना ओबीसी समाजाने दिला आहे. पोलिसांची सोशल मीडियावर करडी नजर असून आक्षेपार्ह संदेश प्रसारित झाल्यास तात्काळ कारवाई येणार असल्याची माहिती सपोनी अण्णाराव खोडेवाड, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर धोत्रे यांनी याप्रसंगी दिली.

# संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटलाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्यावर कठोर कारवाई करावी

## सकल मराठा समाजाच्या वतीने शहर पोलीसांकडे निवेदनाद्वारे मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

शिरूर कासार येथे बंद आंदोलना दरम्यान मराठा समाजाचे नेतृत्व संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात. आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या विरोधात कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी माजलगाव मध्ये सकल मराठा समाजाच्या वतीने शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे दि ०९ जुन रविवार रोजी निवेदनाद्वारे केली आहे.



माजलगाव सकल मराठा समाजाच्या वतीने माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,शिरूर कासार येथे बंद आंदोलना दरम्यान मराठा समाजाचे नेतृत्व संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात.आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या विरोधात कठोर कारवाई करावी.


ज्या लोकांनी मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटलांवर आक्षेपार्ह वक्तव्य करून मराठा समाजाच्या भावना दुखावतील असे प्रक्षोभक वक्तव्य केले आहेत.त्यामुळे दोन समाजात जातीय तेढ निर्माण होऊ शकते, त्याकरिता अशा समाजास विघातक प्रवृत्ती असणाऱ्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने दि ०९ जुन रविवार रोजी माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक केतन राठोड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# शेतकऱ्यांच्या घरात गॅस सिलेंडरचा स्फोट


## जिवीतहानी नाही मात्र ४ लाखांचे आर्थिक नुकसान

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सादोळा येथील वीट गल्लीतील गरीब कुटुंबांतील भाऊसाहेब खुशालराव सोळंके यांच्या घरांतील एच.पी.गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन घरातील रोख रक्कमेसह मौल्यवान वस्तु, अन्नधान्य,कपडे,संसार उपयोगी साहित्य उद्ध्वस्त झाले आहे.मात्र या घटनेत सुदैवाने जिवित हानी झाली नाही,हि घटना दि ०९ जुन शनिवार रोजी रात्री घडली असुन पेरणीच्या तोंडावर संसार उघड्यावर आल्याने प्रशासनाने तातडीने पंचनामा करुन आर्थिक मदत देण्याची मागणी







शेतकरी भाऊसाहेब सोळंके यांनी प्रशासनाला केली आहे.

या घटने विषयी मिळालेली माहिती अशी की, माजलगाव तालुक्यातील सादोळा येथील विट गल्लीत राहाणारे गरीब शेतकरी भाऊसाहेब खुशालराव सोळंके यांच्या घरातील एच.पी.कंपनीचा गॅस सिलेंडरचा दि ०९ जुन शनिवार रोजी रात्री स्फोट होऊन त्यांच्या घरातील मौल्यवान वस्तु,त्यामध्ये दागदागिने, मोबाईल, कपडे,अन्नधान्य,व रोख रक्कम,अशाप्रकारे या स्फोटामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे त्यामध्ये ३ तोळे सोने, २०,००००/(दोन लाख रुपये),मोबाईल व घरात ठेवलेली नगदी रोख रक्कम २५०००(पंचवीस हजार) अशी एकुण ४,००००० ( चार लाख रुपयांचे ) आर्थिक नुकसान झाली आहे.आज त्यांच्या कुटुंबावर फार मोठे संकट आले आहे.सध्या पेरणीचे दिवस असल्यामुळे

◀◀ पान ३ वर

# सोनार समाज हक्क परिषदेच्या बीड जिल्हा समन्वयकपदी ज्ञानेश्वर पोतदार

धारूर । प्रतिनिधी

सोनार हक्क परिषद महाराष्ट्र राज्य या सर्व शाखेय सोनार समाज संघटनेच्या सामाजिक व संघटनात्मक पदावर बीड जिल्हा समन्वयक पदी ज्ञानेश्वर पोतदार (दीक्षित) यांची निवड करण्यात आली या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे

श्री ज्ञानेश्वर पोद्दार हे मागील अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रात व पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत तसेच सोनार समाजातही त्यांनी समाज बांधवांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सतत अनेक वेळा प्रयत्न करून समाजाच्या संघटनात्मक बांधणीत



महत्त्वपूर्ण कार्य केल्यामुळे सोनार समाज हक्क परिषदेतर्फे श्री ज्ञानेश्वर पोतदार यांची निवड संस्थापक अध्यक्षश्री राजेश पंडित यांनी निवडपत्रा द्वारे केली आहे या निवडीचे संपूर्ण बीड जिल्हा भरातून सोनार समाज बांधवातून व सर्व मित्र परिवार

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यातील दगडूशेठ गणेश मंडळाचा 'देखावा' ठरला; आशियातील सर्वात उंच शिवमंदिर, हे खास आकर्षण

**पुणे । प्रतिनिधी**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टतर्फे १३२ व्या वर्षाच्या गणेशोत्सवानिमित्त (ऋूपशीहेंीर्रीं) हिमाचल प्रदेशमधील जटोली शिवमंदिराची प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. आशियातील सर्वात उंच शिवमंदिर म्हणून हे मंदिर ओळखले जाते. उत्तुंग हिमालयाच्या सानिध्यात प्रतिष्ठित आणि अत्यंत पवित्र असलेल्या मंदिराची तेजस्वी प्रतिकृती यंदाच्या गणेशोत्सवात दगडूशेठ (ऊसरर्वीीहशींह) हलवाई गणपती ट्रस्ट तर्फे साकारण्यात येणार असून भाविकांकरीता विशेष आकर्षण ठरणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष माणिक चव्हाण यांनी दिली. त्यामुळे, यंदाच्या गणेशोत्सवात गणपती देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना व पर्यटकांना हिमाचल प्रदेशमधील प्रति शिवमंदिराच्या दर्शनाचा लाभ घेता येईल, असेच म्हणावे लागेल.




सणस मैदानासमोरील हिराबाग कोठी येथील ट्रस्टच्या सजावट विभागात सजावटीचा शुभारंभ सोहळा कलादिग्दर्शक अमन विधाते व दिपाली विधाते यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस हेमंत रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. गेली अनेक वर्षे विविध मंदिरांची उत्कृष्ट प्रतिकृती सजावटीतून साकारण्याकरीता ट्रस्ट प्रयत्नशील आहे. यंदाची प्रतिकृती असलेले हिमाचल प्रदेशच्या सोलन मधील जटोली शिव मंदिर हे डोंगराच्या माथ्यावर वसलेले भव्य मंदिर आहे. जटोली हे नाव महादेवाच्या लांब जटावरून पडले आहे. हे मंदिर स्थापत्यकलेचा चमत्कार आहे. पुराणातील उल्लेखानुसार भगवान शिवाच्या सर्वात प्राचीन मंदिरांपैकी एक असून हे मंदिर एकेकाळी भगवान शंकराचे विश्रामस्थान होते, असे मानले जाते. जटोली मंदिर विशिष्ट अशा दक्षिण-द्रविड वास्तुशैलीमध्ये बांधले गेले आहे आणि ते सलग तीन पिरॅमिड ने बनलेले आहे. पहिल्या पिरॅमिडवर गणेशाची प्रतिमा तर दुसऱ्या पिरॅमिडवर शेष नागाची प्रतिमा दिसते. हे मंदिर बांधण्यासाठी ३९ वर्षे लागली. या मंदिराची उंची अंदाजे १११ फूट आहे. मंदिरातील दगडांवर थाप मारल्यावर डमरू सारखा आवाज देखील येतो.

**१२५ फूट लांब अन् ११ फूट उंच**

गणेशोत्सवात साकारण्यात येणाऱ्या जटोली शिवमंदिराच्या प्रतिकृतीचा आकार १२५ फूट लांब, ५० फूट रुंद आणि ११ फूट उंच असणार आहे. मंदिराची प्रतिकृती फायबरमध्ये उभारण्यात येणार असून त्यावर रंगकाम करण्यात येईल. मुख्य सभामंडपातील खांबांची रचना सुटसुटीत असून भाविकांना लांबून सहजतेने श्रीं चे दर्शन घेता येईल. कलादिग्दर्शक अमन विधाते यांनी मंदिराचे काम, विद्युतरोषणाइचे काम वाईकर बंधू, मंडपव्यवस्था काळे मांडववाले यांनी केली आहे.

# पुणे-सातारा महामार्गावर वाहनांच्या ५ किमी पर्यंत रांगा

**खेड । प्रतिनिधी**

खेड-शिवापूर फाट्यावर सुरू असलेल्या कामामुळे तसेच कासुर्डी फाट्यावर व खेड-शिवापूर फाट्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे पुणे-सातारा महामार्गावर खेड-शिवापूर ते शिंदेवाडी अशी सुमारे पाच किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र सकाळच्या वेळी दिसून आले. यामुळे प्रवाशांना व पर्यटकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागला.




रविवारी सुट्टी असल्याने पुणे शहरासह जिल्ह्यातील नागरिक कोकण, महाबळेश्वर, पाचगणी येथे पर्यटनाला जाण्यासाठी बाहेर पडले होते. त्यामुळे सकाळी आठ वाजल्यापासूनच खेड शिवापूर फाटा ते खेड शिवापूर बाग व पुढे शिंदेवाडी अशा सुमारे पाच किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

दरम्यान खेड-शिवापूर फाट्यावर उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे कोंढणपूर फाट्यावरील उड्डाणपूल संपला की पुढील वाहतूक सेवा रस्त्याने वळविली आहे. त्या ठिकाणी मोठया प्रमाणात खड्डे पडले असल्याने व गतीरोधक अरुंद रस्ता असल्याने वाहनांच्या रांगा वाढत जाऊन त्या पाच ते सहा किलोमीटर पर्यंत पोहोचल्या होत्या. यामुळे पर्यटकांना हे अंतर पार करण्यासाठी तब्बल एक तास वाट पाहावी लागत होती.

दरम्यान आठवड्यातून तीन दिवस या भागात वाहतूक कोंडी होत असते. यामुळे या उड्डाणपुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी आता पर्यटकांकडूनही होत आहे.

वारंवार याठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. सबंधित ठेकेदारास अनेकवेळा सांगूनही येथील खड्डे बुजविण्याबाबत उदासीनता दिसत आहे असे महामार्ग पोलिसांनी सांगितले.

# पाणी तुंबल्याने नागरिकांचे हाल

**औंध । प्रतिनिधी**

मॉन्सून सुरू झाल्यानंतर पहिल्याच पावसात मोठ्या प्रमाणावर पाणी तुंबल्याने सकाळनगर, सिंध सोसायटी, नॅशनल सोसायटीच्या परिसरात नागरिकांचे अक्षरशः हाल झाले. दरवर्षी याठिकाणी पाणी तुंबण्याच्या घटना घडण्याचा अनुभव आहे. सकाळनगर ते बाणेर फाटा येथे नेहमी पाणी तुंबते. परंतु, यावर्षी अधिक तुंबल्याने ही परिस्थिती निर्माण झाली. अभिमानश्री सोसायटी, चव्हाणनगर, एनसीएल या दक्षिण बाजूने मोठ्या प्रमाणावर पाणी बाणेर रस्त्यावर येते. परंतु, पाण्याचा हा एवढा मोठा प्रवाह सामावून घेणारे मोठे चेंबर नसल्याने पाणी तुंबते. परिणामी सकाळनगर ते बाणेर फाटा या दरम्यान दरवर्षी वाहतूककोंडी होते. या रस्त्यावर मेट्रोचे काम सुरू असताना खोदाई करताना सांडपाणी वाहिनी तुटणे, राडारोडा व कचरा पडून कोंडले जाणे असे प्रकार घडल्याने पाण्याचा प्रवाह संथ झालेला दिसून आला. परिणामी रस्त्यावर पाणीच पाणी साचले



व वाहतूककोंडी होऊन वाहनचालकांचे हाल झाले. अशीच दयनीय अवस्था सुतारवाडीतील रहिवाशांचीही झाली आहे. येथील स्मशानभूमीचा रस्ता पूर्णपणे बंद झाल्याने वाहनचालकांची मात्र तारांबळ उडाली होती.

## ॲपवर खाते उघडायला सांगून पावणेनऊ लाखांची फसवणूक

**बारामती । प्रतिनिधी**

येथील एका व्यक्तीस ऑनलाइन पेमेंट करण्यास सांगून पावणेनऊ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. याबाबत प्रतीक महेश कलवाडिया (वय ३९, रा. सायली हिल, बारामती) यांनी याप्रकरणी फिर्यादी दिली आहे. त्यावरून बारामती शहर पोलिसांनी मेरिलीना, निलम सिंग, ओमकार बुधडा, सुखविंदर (सर्वांचे पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीच्या मोबाईलवरील प्रोव्हॅक्स हे प डाउनलोड करून त्यावर खाते उघडण्यास सांगितले गेले. त्यानंतर त्या अकाउंटवर वेगवेगळ्या रकमा भरण्यास सांगितले गेले. फिर्यादीने मार्च महिन्यापासून ते एप्रिल अखेरपर्यंत या खात्यावर ८ लाख ७५ हजार रुपये जमा केलेले आहेत. मात्र, फिर्यादीस शंका आल्यानंतर त्यांनी ते पैसे काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, ते पैसे काढता येत नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली.

# खड्ड्यात पडून मुलीचा मृत्यू; रस्त्याच्या ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

**कोंढवा । प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्त्यावरील ग्रेडसेपरेटरसाठी (समतल विलघक) खोदलेल्या खड्ड्यात पडून एका मुलीचा मृत्यू शनिवारी (ता. ९) झाला. या प्रकरणी खडीमशिन चौक ते कात्रजकडे जाणाऱ्या रस्त्याच्या ठेकेदारावर कलम ३०४ अ अन्वये सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी जगदीश छगन शिलावट (वय ३५) यांनी कोंढवा पोलिसांत फिर्याद दिली आहे.



कात्रज-कोंढवा रस्त्यावरील महाकाली मंदिराजवळील ग्रेडसेपरेटरसाठी खोदलेल्या खड्ड्याला कोणत्याही प्रकारच्या सुरक्षाविषयक बाबीचे पालन न करण्यात आल्यानेच ही घटना घडली असल्याचे कारण देत पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर खड्डा रस्ता बनविणाऱ्या ठेकेदाराने खोदला असून सदर खड्ड्यास कोणताही संरक्षक कठडा अथवा इतर कोणतीही संरक्षक उपाययोजना केली नाही. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळेच सदर खोदलेल्या खड्ड्यात पावसाच्या साचलेल्या पाण्यात बडून मुस्कान शिलावट (वय १६) या मुलीचा मृत्यू झाला आहे. त्यानुसार मुलीच्या नातेवाईकाच्या फिर्यादीनुसार त्या पद्धतीने गुन्हा नोंद केला असल्याची माहिती कोंढवा पोलिसांनी दिली. याबाबतचा पुढील अधिक तपास पोलिस निरिक्षक मानसिंग पाटील करत आहेत.

# महापालिकेच्या विरोधात कोंढवा ग्रामस्थांचे आंदोलन; विविध खोदकामांच्या विरोधात संताप

**कोंढवा । प्रतिनिधी**

महापालिकेच्या विरोधात कोंढवा ग्रामस्थांनी रविवारी (ता. ९) आंदोलन केले. विविध ठिकाणी विकासकामांच्या नावाखाली खोदकाम करत नागरिकांना वेठीस धरल्याच्या विरोधात संताप व्यक्त करण्यात आला. यासंबंधात कोंढव्यातील दशरथ मरळ चौकात काहीकाळ रास्ता रोको करण्यात आला.

कोंढवा बुद्रुक भागातील पोलिस ठाणे, शूरवीर येसाजी कामठे चौक, दशरथ मरळ चौक, पुण्यधाम आश्रम रस्ता, खडीमशीन चौक, श्रीकुंज सोसायटी, काकडेवस्ती तसेच येवलेवाडी येथील प्रमुख रस्त्यांवर




महापालिकेच्या वतीने खोदकाम करण्यात आले आहे. त्या खोदकामाच्या विरोधात भाजपचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष जालींदर कामठे आणि माजी आमदार महादेव बाबर यांच्या नेतृत्वात सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले. कामठे म्हणाले, 'सदरचे खोदकाम हे गेली कित्येक दिवस सुरु आहे. त्यामुळे रस्त्याच्या एका बाजूला प्रचंड मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहे. सध्या पाऊस सुरु झाला असल्यामुळे त्या खड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचून तसेच रत्यावर मोठ्या प्रमाणावर चिखल होऊन अपघात होत आहेत.पिण्याच्या पाण्याची वाहिनी आणि वीजेच्या वाहिन्या या भूमिगत आहेत. काम करतेवेळी त्याची तुटाफुट होऊन नागरिकांना प्राथमिक गोष्टीसाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. कात्रज कोंढवा रस्त्याचे काम रखडले असून मोठ्या खड्ड्यात चार मुली पडून एका मुलीचा नाहक बळी गेला आहे, अशा वारंवार घटना घडत असल्याचे माजी आमदार महादेव बाबर यांनी म्हटले. कोंढवा आणि येवलेवाडी येथे सर्वच बाजूने खोदकाम सुरू असल्याने वाहतुकीची समस्या फार मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊन वाहतूककोंडी होत आहे. याचा त्रास ग्रामस्थांना होत असून हे काम लवकर लवकर पूर्ण होण्यासाठी आपल्या विभागाकडून त्वरित कार्यवाही व्हावी अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने यापेक्षाही मोठे आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देत महापालिकेच्या कनिष्ठ अभियंता सिद्राम पाटील यांना कोंढवा पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक (गुन्हे) मानसिंग पाटील यांच्या मध्यस्थीने निवदेन देण्यात आले. यावेळी कोंढवा पोलिसांकडून बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या वेळी माजी नगरसेविका संगीता ठोसर, गणेश कामठे, भरत धर्मावत, गंगाधर बधे, चंद्रकांत गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी नियंत्रण कक्ष कार्यान्वित

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकरी, वितरक व विक्रेते यांना क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्याकरिता कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या सुचनेनुसार आयुक्तालयस्तरावर नियंत्रण कक्ष स्थापित करण्यात आला असून या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी व्हॉट्सप क्रमांक (केवळ संदेश पाठविण्याकरिता) ९८२२४४६६५५ उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

राज्यातील खरीप हंगामात बियाणे, खते व किटकनाशके या निविष्ठांचा पुरवठा वेळेत गुणवत्तापूर्ण व मुबलक प्रमाणात होणे अत्यावश्यक आहे. यासाठी कृषी विभागाच्या टोल फ्री (तोंडी तक्रार नोंदविण्याकरिता) १८००२३३४००० क्रमांकावरही संपर्क करता येईल. तसेच अडचण किंवा तक्रार लेपीौश्री.लिं.ारहरीरिहींीरसारळश्र.लो या ई-मेलवरही नोंदवता येईल.

संबंधितांनी व्हॉट्सप, टोल फ्री भ्रमणध्वणी क्रमांक तसेच ई-मेलवर अडचणी, निविष्ठांची गुणवत्ता, किंमत, साठेबाजी व लिंकींग बाबत असलेल्या तक्रारी नोंदवताना, नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व अडचणी किंवा तक्रारीचा संक्षिप्त तपशिल द्यावा. अडचणीबाबत माहिती कोऱ्या कागदावर लिहून त्याचा फोटो व्हॉट्सप किंवा ई-मेलवर पाठवल्यास तक्रारींचे निराकरण करणे सोईस्कर होईल.

ज्या शेतकऱ्यांना व्हॉट्सपचा वापर करणे शक्य नसेल त्यांनी वरील टोल फ्री क्रमांकावर संपर्क क्रमांकासह तोंडी तक्रारी नोंदवाव्यात. शेतकऱ्यांना त्यांच्या तक्रारी ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत नोंदवता येतील, असे कृषी संचालक विकास पाटील यांनी कळविले आहे.

# रंगत-संगत प्रतिष्ठान आणि करम प्रतिष्ठानतर्फे दीपक करंदीकर स्मृती पुरस्काराने मिलिंद छत्रे यांचा गौरव

पुणे : आशयसूचक कवितेपेक्षाही गझल या काव्य प्रकाराला आजच्या काळात वेगळी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. सामाजिक आशयसंपन्न गझलेच्या माध्यमातून गझलेची स्वतंत्र्य अभिव्यक्ती दिसून येते. या उलट काव्य हा साहित्यप्रकार मुक्तछंद सोडून मोकाट छंदाकडे झुकला आहे. गझल प्रकारातील आचारसंहिता जपून 'इस्लाह' म्हणजेच दुरुस्ती करणे गझलकारांनी आजही टिकवून ठेवल्याने पुनर्लेखनाच्या माध्यमातून ही साहित्यकृती नेमकी व नेटकी होत जाते, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी केले.

रंगत-संगत प्रतिष्ठान आणि करम प्रतिष्ठानतर्फे गझलकार दीपक करंदीकर स्मृती पहिला पुरस्कार गझलकार मिलिंद छत्रे यांना आज (दि. ९) प्रा. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. पत्रकार भवन येथे कार्यक्रमाचे




आयोजन करण्यात आले होते. शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ड. प्रमोद आडकर, करम प्रतिष्ठानचे अध्यक्ष भूषण कटककर, विद्या दीपक करंदीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. गझलकार दीपक करंदीकर यांच्या साहित्यकृतीत जबरदस्त ताकद होती. सुरेश भटांची परंपरा पुढे नेण्यात करंदीकर यांचा मोठा हात होता ते निस्पृह व उत्तम वाङ्मयीन कार्यकर्ता होते, असे गौरवोद्गार काढून प्रा. जोशी पुढे म्हणाले, छत्रे हे आश्वासक गझलकार आहेत. त्यांच्या गझलांमधून अनुभवविश्व, जगाकडे पाहण्याची समृद्ध दृष्टी दिसून येते. कवीसाठी अनुभवसमृद्धी, साधनाचे संचित महत्त्वाचे असते. परंतु आजच्या साहित्यकारांची श्रम करण्याची तयारी नाही. कविता ही शब्दांची आतषबाजी नव्हे तर शब्दांची उपासना आहे हे आज जाणून घेतले जात नाही त्यामुळे वाङ्मय प्रकाराची प्रतिष्ठा ठेवली जात नाही, ही आजची विदारक परिस्थिती आहे. साहित्य प्रकारातील परंपरा मोडली तरी चालेल परंतु ती आधी समजून घेणे आवश्यक आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. समीक्षेचे अध:पतन हे साहित्याचे अध:पतन ठरते आहे, अशी टिप्पणीही त्यांनी साहित्यक्षेत्रातील समीक्षेविषयी केली.चाळीस वर्षांच्या मैत्र-स्नेहाचा धागा उलगडून ड. प्रमोद आडकर यांनी प्रास्ताविकात दीपक करंदीकर यांच्या स्मृती कायम जपल्या जाव्यात यासाठी उत्कृष्ट गझलकाराची निवड करून पुरस्कार प्रदान करण्यास सुरुवात करण्यात आली आहे, असे सांगितले.पुरस्कारामागील भूमिका विशद करीत भूषण कटककर म्हणाले, सुरेश भट यांची गझल परंपरा पुढे चालविण्यात दीपक करंदीकर यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. त्यांच्या गझलांमध्ये तरलता आणि आर्तता यांचा संगम दिसून येतो. पुरस्काराला उत्तर देताना मिलिंद छत्रे म्हणाले, कवीला आतून दाटून येते तेव्हा तो लिहिता होतो; तसेच रंगत-संगत, करम प्रतिष्ठानसारख्या संस्थांमार्फत साहित्यिकाला बाह्यप्रेरणा मिळते. ज्यातून लिखाण सुधारण्यास, सहजभाव अंगी येण्यास मदत होते. सादरीकरण हे उर्जा असेल तर असे पुरस्कार हे उर्जेचे भांडार आहेत. कविता-गझल हा साहित्यप्रकार विरंगुळा किंवा वेळ जाण्यासाठी नव्हे तर गांभीर्याने करण्याची गोष्ट आहे. पुरस्काराने प्रेरणा मिळते व नविन काहीतरी करण्याची उर्जाही लाभते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा देशपांडे यांनी केले तर परिचिय पत्रवाचन वासंती वैद्य यांनी, सन्मानपत्र वाचन प्राजक्ता वेदपाठक यांनी केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात आयोजित मराठी स्व-रचित गझल संमेलनात प्रभा सोनवणे, अमृता जोशी, डॉ. दाक्षायणी पंडित, डॉ. मृदुला खैरनार-कुलकर्णी, स्वप्नील पोरे, वैशाली मोहिते, प्रा. शैलजा किंकर, वर्षा कुलकर्णी, भालचंद्र कुलकर्णी, सुजाता पवार, स्वाती यादव यांचा सहभाग होता.

# झाडाची फांदी डोक्यात पडल्याने तरुणाचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

झाडाची फांदी डोक्यात पडल्याने तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शनिवारी रात्री घडली. बिबवेवाडीतील पोकळे वस्ती परिसरात हा प्रकार घडला.

योगेश ज्ञानदेव वानेरे (वय २९, रा. सध्या रा. पोकळे वस्ती, बिबवेवाडी, मूळ रा. वाघुड, ता. मलकापूर, जि. बुलढाणा) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी बिबवेवाडी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री साडेअकराच्या सुमारास योगेश वानेरे आणि त्यांचे मित्र सुमीत बगाडे ओटा वसाहतीतील महादेव मंदिराजवळ गप्पा मारत थांबले होते. त्यावेळी झाडाची मोठी फांदी तुटली आणि योगेश यांच्या डोक्यात पडली.

फांदी डोक्यात कोसळल्याने योगेश गंभीर जखमी झाले होते. त्यांनी तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. योगेश यांचे मित्र सुमीत या घटनेत बचावले. या घटनेची माहिती परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त संदीपसिंग गिल, सहायक आयुक्त अश्विनी राख, बिबवेवाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनय पाटणकर यांनी घटनास्थळी भेट दिली.